www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **तरुणांचा बुलंद आवाज**

# युवक आधार
मराठी




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ४६ शनिवार, दि. २५ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# राज्यात पुढील तीन दिवस अवकाळी पावसाचे सावट, अरबी समुद्रातील कोणत्या बदलाचा बसू शकतो फटका?

**दैनिक युवक आधार**
**मुंबई**

यंदा पावसानं लवकर सुरुवात करून दमदार हजेरी लावली. मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यानं प्रचंड नुकसान झालं आहे. अशात पुढील तीन दिवस राज्यात अवकाळी पावसाचे सावट असणार आहे, असा अंदाज हवामान विभागानं वर्तविला आहे.

यंदा २७ मे रोजी राज्यात मान्सून दाखल झाला. अतिवृष्टीनं मराठवाडा तसेच राज्यातील काही भागात मोठ्या प्रमाणात शेतीचं नुकसान झालं आहे. मराठवाड्यात तर मुसळधार पावसामुळे पिकांसह घरांचे आणि जनावरांचे नुकसान झाले आहे. या संकटातून अजून बळीराजा सावरत नाही, तोच आता पावसाबाबत हवामान खात्याकडून एक मोठी अपडेट समोर आली आहे. राज्यात पुढील तीन दिवस अवकाळी पावसाचाचा अंदाज हवामान विभागानं वर्तविला आहे.

पूर्व-मध्य आणि लगतच्या आग्नेय अरबी समुद्रावरील कमी दाबाचा पट्टा गेल्या ३ तासांत २५ किमी प्रतितास वेगाने उत्तर-ईशान्येकडे सरकला. तर २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता पूर्व-मध्य अरबी समुद्रावर, १४.०° उत्तर अक्षांश आणि ७०.६° पूर्व रेखांशाच्या जवळ, पणजी (गोवा) पासून सुमारे ३८० किमी पश्चिम-नैऋत्येस, अमिनीदिवी (लक्षद्वीप) पासून ४०० किमी वायव्येस आणि मंगलोर (कर्नाटक) पासून ४८० किमी पश्चिम-वायव्येस केंद्रस्थानी होता. पुढील २४ तासांत कमी दाबाचा पट्टा पूर्व-मध्य अरबी समुद्रातून जवळजवळ उत्तर-ईशान्येकडे सरकण्याची शक्यता आहे.

**आग्नेय बंगालच्या उपसागरावरील कमी दाबाचे क्षेत्र :** आग्नेय बंगालच्या उपसागरावरील कमी दाबाचं क्षेत्र गेल्या ३ तासांत हळूहळू पश्चिम-वायव्येकडे सरकले आहे. तर आज २४ ऑक्टोबर २०२५ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार ८.३० वाजता त्याच प्रदेशावर स्थिरावलं आहे.

**कमी दाबाच्या क्षेत्राचे चक्रीवादळात होणार रुपांतर :** कमी दाबाचे क्षेत्रपश्चिम-वायव्येकडे सरकण्याची शक्यता आहे. २५ तारखेपर्यंत आग्नेय आणि लगतच्या मध्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे प्रमाण वाढेल. त्यामुळे २६ तारखेपर्यंत खोल दाबाचे प्रमाण वाढेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तर २७ तारखेपर्यंत नैऋत्य आणि लगतच्या पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरावर चक्रीवादळाचे रूपांतर होईल, असे हवामान विभागानं म्हटलं आहे.



**अवकाळी पावसाचे कारण काय? :** अरबी समुद्राच्या अग्नीयेला कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे हे क्षेत्र उत्तर आणि ईशान्यच्या दिशेनं सरकत आहे. तसेच दक्षिणेकडील कर्नाटक आणि तामिळनाडकडून कमी दाबाचे क्षेत्र वायव्य आणि पश्चिम दिशेदरम्यान प्रवास करत आहे. याचा सर्वाचा परिणाम म्हणून महाराष्ट्र आणि दक्षिण भागात पावसाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मुंबईस कोकणसह राज्यातील काही भागात पुढील तीन दिवस पावसाची शक्यता असल्याचं मुंबई प्रादेशिक हवामान विभागानं म्हटलं आहे. महाराष्ट्रासह भारतातील दक्षिणेतील भागातसुद्धा पावसाची शक्यता आहे. तसेच मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा तसेच ईशान्य भारतातील काही भागातील पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## शेतकऱ्यांमध्ये चिंतेचं वातावरण

ऑक्टोबर महिन्यात तापमानाचा पारा वाढलेला असतो. तसेच ऑक्टोबर महिन्यात मुंबईत सरासरी ३३ ते ३५ अंश सेल्सिअस असे सरासरी तापमान असते. परंतु यावर्षी राज्यात अवकाळी पावसाच्या सरी अजूनही सुरूच आहेत. एकीकडे मराठवाड्यातील बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास पावसानं हिरावून घेतला. सध्या पिकं कापणीचा हंगाम असताना अवकाळी पाऊस झाला तर शेतकऱ्यांचे आणखी नुकसान होण्याची शक्यता आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत असताना पुन्हा अवकाळी पावसाचं संकट घोंगावत आहेत.

## कोणत्या जिल्ह्यांना आहे यलो अलर्ट ?

दुसरीकडं कोकण आणि मुंबईसह राज्यातील काही भागामध्ये शुक्रवारी, शनिवारी मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. यासह रत्नागिरी, रायगड, ठाणे आणि पालघर या ठिकाणीही रविवारपर्यंत हीच स्थिती असणार आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे आणि पालघर या जिल्ह्यांना शुक्रवारी आणि शनिवारी पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. तर दुसरीककडे जळगाव, धुळे, नंदुरबार नाशिक या जिल्ह्यांनादेखील 'यलो अलर्ट' आहे. तर अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यांमध्येसुद्धा पावसाची शक्यता असल्याची माहिती मुंबई प्रादेशिक हवामान विभागातील अधिकारी निता शशिधर यांनी दिली.

# सुप्रसिद्ध गायिका आर्या आंबेकरच्या सुरांनी कामोठेतील दिवाळीचा आनंद द्विगुणित

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी )**

दीपावली सणाच्या मंगलमय वातावरणात पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून आयोजित दिवाळी संध्या या सुश्राव्य संगीत मैफलीला कामोठेवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राष्ट्रीय पुरस्कार विजेती सुप्रसिद्ध गायिका आर्या आंबेकर हिच्या बहारदार गायकीने श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध झाले, ज्यामुळे कामोठे येथील दिवाळीचा आनंद द्विगुणित झाला.

हा कार्यक्रम कामोठे सेक्टर 6मधील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये बुधवारी झाला. भारतीय जनता पक्ष, पनवेल यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात आर्या आंबेकर यांनी विविध मराठी भावगीते, नाट्यगीते आणि चित्रपट गीतांचे सादरीकरण केले. तिने आपल्या गोड आवाजात सादर केलेल्या एकापेक्षा एक सरस गीतांनी उपस्थितांना दिवाळीच्या उत्साहात न्हाऊन टाकले. कामोठे येथे पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या या संगीत मैफलीला नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.




दिवाळीच्या निमित्ताने पनवेल महानगरातील नागरिकांना एक दर्जेदार सांस्कृतिक मेजवानी मिळावी, या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सांगीतिक सुरांनी नटलेल्या या 'दिवाळी संध्या'मुळे कामोठे परिसरातील रसिकांना दिवाळीच्या दिवसांत एक अनोखा आणि अविस्मरणीय अनुभव घेता आला.


या सोहळ्यावेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका अरुण भगत, कुसुम म्हात्रे, जिल्हा चिटणीस विद्या तामखेडे, युवानेते हॅप्पी सिंग, रवी गोवारी, हर्षवर्धन पाटील, अभिषेक पटवर्धन, युवा मोर्च्यामोचा शहर अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमावेळी कामोठे पोलीस ठाण्याच्या विमल बिडवे यांनी नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीकोन सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# झाडांना दिव्यांच्या माळांनी जखडू नका!

## पर्यावरणप्रेमींचे मुख्यमंत्री आणि पर्यावरण मंत्री यांना भावनिक आवाहन

**दैनिक युवक आधार**

**ठाणे :** दिवाळीचा झगमगाट सुरू झाला आहे. रस्ते, सोसायट्या आणि उद्याने दिव्यांच्या प्रकाशाने उजळली आहेत. मात्र या कृत्रिम रोषणाईच्या आड झाडांचा श्वास घोटला जात असल्याची खंत ठाण्यातील पर्यावरण अभ्यासक डॉ. प्रशांत सिनकर यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना निवेदन पाठवून झाडांवरील विद्युत रोषणाईस तात्काळ बंदी घालण्याची मागणी केली आहे.राज्यातील अनेक शहरांमध्ये झाडांवर हॅलोजन्स, एलईडी आणि रंगीबेरंगी दिव्यांच्या माळांनी सजावट केली जाते. काही क्षण आकर्षक वाटणारी ही रोषणाई प्रत्यक्षात झाडांच्या जीवनप्रक्रियेला गंभीर धक्का देते. सूर्यास्तानंतर झाडांची विश्रांती सुरू होते, मात्र कृत्रिम प्रकाश त्यांच्या जैविक घड्याळात गोंधळ निर्माण करतो, वाढीवर आणि आरोग्यावर परिणाम करतो. फक्त झाडेच नव्हे, तर पक्षी आणि निशाचर प्राणीही या कृत्रिम प्रकाशामुळे विस्कळीत होतात. दिशाभ्रम, घरटी



कोसळणे, अंधाराशी सवयीने जगणाऱ्या प्राण्यांचे जीवन उद्ध्वस्त होणे अशा घटना वाढतात. झाडांवरील रोषणाई थांबवणे ही केवळ सौंदर्याची नव्हे, तर शास्त्रीय गरज आहे, असे डॉ. सिनकर यांनी स्पष्ट केले. त्यांनी मुख्यमंत्री आणि पर्यावरण मंत्री यांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे, सण म्हणजे आनंद, प्रकाश आणि उत्साह पण तो निसर्गाचा बळी देऊन नसावा.

झाडे, माती, पाणी आणि प्राणी-पक्ष्यांचा सन्मान केला, तरच आपण खऱ्या अर्थाने ‘निसर्गपूजा’ करू शकतो. म्हणूनच आगामी सणासुदीच्या काळात झाडांवरील कृत्रिम रोषणाईस सक्त बंदी घालण्याचे आदेश द्यावेत.

**पालिकेचे पर्यावरणप्रेम हे केवळ दिखाऊ**

दरम्यान, ठाणे महापालिकेने ‘पर्यावरणपूरक दिवाळी’चा नारा दिला असला तरी शहरातील झाडांवर दिव्यांचा झगमगाट कायम दिसून येत आहे. पालिकेचे पर्यावरणप्रेम हे केवळ दिखाऊ राहिले असून झाडांच्या संरक्षणाकडे कोणीही लक्ष देत नाही, अशी टीका पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

# जैववैद्यकीय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्प तूर्त गोवंडीतच - उच्च न्यायालयाचा निर्णय

**दैनिक युवक आधार**
**मुंबई**

मुंबई महापालिकेचा खासगी कंपनीतर्फे बांधण्यात येणारा जैव वैद्यकीय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्प गोवंडी येथून रायगड जिल्ह्यातील जांभिवली येथे स्थलांतरित करण्यासाठी उच्च न्यायालयाने आणखी २१ महिन्यांची मुदतवाढ दिली. ही अंतिम मुदतवाढ असल्याचेही न्यायालयाने प्रामुख्याने स्पष्ट केले. न्यायालयाच्या निर्णयामुळे हा प्रकल्प तूर्त गोवंडी येथेच कार्यान्वित राहणार आहे.



कंपनीने प्रकल्पासाठी सर्व कायदेशीर परवानग्या मिळवल्या आहेत, परंतु, जांभिवली येथे आवश्यक पायाभूत सुविधा नाहीत. त्यामुळे, प्रकल्प स्थलांतरित करून कार्यान्वित करण्यासाठी विलंब झाला आहे. हा विलंब कंपनीमुळे झालेला नाही. असे असले तरी प्रकल्प स्थलांतराला विलंब झाल्याचे नाकारता येत नाही, असे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने आदेशात नमूद केले. तसेच, प्रकल्प स्थलांतरित करण्यासाठी झालेल्या विलंबाकरिता कंपनीला दोन लाख रुपये दंड सुनावला व तो मुंबईतील अंध मुलांच्या शाळेला देण्याचे आदेश दिले.

महापालिका एन्व्होक्लेन प्रायव्हेट लिमिटेडच्या सहकार्याने हा प्रकल्प राबवत आहे. तथापि, प्रदूषणाच्या कारणास्तव हा प्रकल्प स्थलांतरित करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार, प्रकल्प नवी मुंबईतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) क्षेत्रात मोडणाऱ्या पाताळगंगा येथे स्थलांतरित करून कार्यान्वित करण्यात येणार होता. या सर्व प्रक्रियेसाठी न्यायालयाने कंपनीला दोन वर्षांची मुदतही दिली होती.

परंतु, पाताळगंगाऐवजी पनवेल तालुक्यातील जांभिवली येथे प्रकल्प स्थलांतरित करण्याचे आदेश सरकारने फेब्रुवारी २०२४ मध्ये एमआयडीसीला दिले. त्यामुळे, नव्या ठिकाणी प्रकल्प स्थलांतरित करून तो कार्यान्वित करण्यासाठी मुदतवाढ द्यावी, या मागणीसाठी कंपनीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने कंपनीची ही मागणी मान्य केली व प्रकल्प जांभिवली येथे स्थलांतरित करून कार्यान्वित करण्यासाठी अंतिम २१ महिन्यांची मुदत दिली.

**कंपनीने म्हणणे काय होते ?**

प्रकल्पासाठी कंपनीने सर्व आवश्यक परवानग्या मिळवल्या आहेत आणि पुढील एक वर्षात प्रकल्प कार्यान्वित केला जाऊ शकतो, असे कंपनीच्या वतीने वरिष्ठ वकील आस्पी चिनॉय यांनी सुनावणीच्या वेळी न्यायालयाला सांगितले होते. न्यायालयाच्या आदेशानंतर काही महिन्यांनी आधीचा भूखंड उपलब्ध करण्याचा निर्णय एमआयडीसीने रद्द केला आणि दुसरा भूखंड उपलब्ध केला. याबाबत न्यायालयाला माहिती देण्याचे एमआयडीसीने म्हटले होते. परंतु, हा निर्णय कळवण्यात आला नाही. परिणामी, न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी वर्षभराचा विलंब झाला असून त्यासाठी कंपनी जबाबदार नाही, असेही चिनॉय यांनी न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला होता. तसेच, नव्या जागेवर प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी एक वर्षाची मुदत देण्याच्या मागणीचा पुनरूच्चार केला होता.

## पनवेल महापालिकेच्या स्वछतादूताच्या प्रामाणिकपणाचे होत आहे कौतुक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
गरिबी असली तरी स्वतःच्या मेहनतीने दोन वेळा ची चटणी भाकरी खायची ही आपली प्रवृत्ती आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पनवेल शहरातील मिरची गल्लीमध्ये एका व्यापाराचे दोन लाख 46 हजार परत करून स्वच्छता दूताने प्रामाणिकपणाची संस्कृती दाखवून देत एक आदर्श वस्तूपाठ ठेवला. त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

ही दुनिया खूप स्वार्थी आहे असे आपण सहज म्हणतो. दुसऱ्याच्या संपत्तीवर डोळा ठेवून जगणारे सुद्धा खूप जण समाजामध्ये दिसून येतात. पण आपल्या अवतीभवती प्रामाणिक माणसं खूप असतात याची प्रचिती अनेकदा येते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पनवेल शहरांमध्ये मिरची गल्लीत रात्री आठ वाजण्याच्या सुमारात एका प्लास्टिकच्या पिशवीमध्ये दोन लाख 46 हजार रुपयांचा बंडल गुंडाळलेल्या अवस्थेत रस्त्यावर पडल्याचे दिसून आले. त्याचवेळी पनवेल महानगरपालिकेची घंटागाडी त्या ठिकाणी कचरा संकलन करत होती. रस्त्यावर पडलेला प्लास्टिक पिशव्यांमधील नोटांचा जुडगा कचरा म्हणून स्वच्छता दूतांनी उचलला. मात्र तो जड असल्यामुळे त्यामध्ये नेमके काय आहे असा प्रश्न घंटागाडी कामगारांना पडला. त्यानुसार त्यांनी उघडून पाहिले असता त्यामध्ये पैशांचे बंडल आढळून आले. मात्र हे धन दुसऱ्याचे असून ही लक्ष्मी आपल्याला प्रसन्न होणार नाही हा प्रामाणिक विचार संबंधित स्वच्छता दूतांच्या मनाला शिवला. त्याच वेळी एक व्यापारी धाय मोकलून रडत असल्याचे घंटागाडी कामगारांच्या निदर्शनास आले. त्याला विचारले असता माझे पैसे पडल्याचे तो म्हणाला. किती पैसे हरवले आहेत अशी त्याला विचारणा केली असता त्याने रक्कम सांगितल्यानंतर हे पैसे त्याचेच आहेत हे खात्री स्वच्छता दूतांना पटली. त्यांनी लागलीच ही रोकड संबंधित व्यापाऱ्याला परत करत प्रामाणिकपणाचे दर्शन घडवले. संबंधित व्यापाऱ्याने त्यांचे आभार व्यक्त करत दिवाळीच्या शुभेच्छा. दिल्या. यावेळी स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर घंटागाडी सुपरवायझर सनी बेद व कर्मचारी उपस्थित होते. याबाबत सर्व स्तरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

==========================================

## मोटार सायकलीच्या विचित्र अपघातात माकडाचा मृत्यू तर दोघे जखमी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**
पळस्पे वाहतूक शाखेच्या हद्दीमध्ये मुंबई गोवा हायवे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 कर्नाळा अभयारण्य जवळ गोवा जाणाऱ्या लेनवर काळया रंगाची होंडा कंपनीची यूनिकॉन दुचाकी जात असताना दुचाकी समोर अभयारण्यातील माकड आडवे आले. हे माकड दुचाकीमध्ये अडकून दुचाकी रस्त्यावर पडून अपघात झाला.

या अपघातामध्ये दुचाकी क्र. एम एच 06 सीके 6425 वरील चालक किरकोळ जखमी झाला आहे व पाठीमागे बसलेला युवक गंभीररित्या जखमी झाला आहे. नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या अंमलदार यांनी या ठिकाणी ॲम्बुलन्स बोलावून जखमींना गांधी हॉस्पिटल पनवेल या ठिकाणी उपचारासाठी पाठवण्यात आले. या अपघातामध्ये माकडाचा मृत्यू झाला आहे.

==========================================

## इको गाडी टाळावेत कोसळली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
पनवेल तालुक्यातील मोहो गावात पार्किंगची सोय अपुरी असल्याने तलावाभोवती अनेक जण वाहन पार्किंग करतात. मात्र, हीच सवय एका वाहनचालकासाठी चांगलीच धोकादायक ठरली. हँडब्रेक न लावता पार्किंग केलेली प्रवासी इको गाडी थेट खोल तलावात कोसळली.

या घटनेची माहिती समजताच परिसरात मोठी गर्दी झाली. ग्रामस्थांच्या मदतीने आणि जेसीबीच्या सहाय्याने सुमारे दोन तासांच्या प्रयत्नांनंतर गाडी तलावातून बाहेर काढण्यात आली. पार्किंग केलेली प्रवासी गाडी थेट तलावात कोसळली, सुदैवाने जीवितहानी टळली सुदैवाने गाडीत प्रवासी नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र वाहनाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. गावातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या या तलावाभोवती सुरक्षा कठडे नसल्याने अपघाताचा धोका कायम आहे. रस्ता वळणदार असल्याने विशेषतः नवीन वाहन चालकांना वळणाचा अंदाज येत नाही आणि त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता वाढते. तलावाभोवती सुरक्षा कठडे उभारणे अत्यंत गरजेचे आहे. मोठी दुर्घटना घडण्याआधी प्रशासनाने तातडीने कठडे उभारावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

# वृक्ष तोडीमुळे जंगलाचा राजा गावाच्या वेशीवर...

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले , सुरगाणा**
**रान मेंढाचा राजा तो**
**तेल परवडे वनाल**
**तेची हिवळी वना वं**
**तोही गर्जना मार वं**



गेल्या पंधरा, वीस वर्षांत आदिवासी डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्यामुळे डोंगर उघडे,बोडके दिसतात अशा डोंगराळ भागातील वनसंपत्तीचे रक्षण कर्ता जंगलातील वाघ (राष्ट्रीय प्राणी) वन्यप्राणी गावठी बोलीत त्याला खड्या म्हणतात.वाघ हे हिंमत,ताकद, आत्मविश्वास आणि गतीचे प्रतीक आहे. त्याबद्दल निसर्गातील डोंगराळ भाग दरी, खोरी भकास होत असलेल्या जंगलातील वृक्ष,वाघ संदर्भात डेरा आदिवासी लोकगीतांतून शब्दबद्ध होताना संवेदना व्यक्त करताना दिसतात. डेरा लोकगीतातून समग्र मानव जातीलाच आवाहन केले आहे. पुर्वीच्या काळी घनदाट जंगलात मोठ्या प्रमाणात ससे,हरण,वळीण,बाऊल,मोहोट (रान मांजर) रान डुक्कर या प्राण्यांचे अस्तित्व जंगलात टिकून होते. त्यामुळे जंगलातील वाघ गावाच्या वेशीवर येत नव्हते आज मांसाहारी प्राणी जंगलात छोटे,मोठे प्राणी हे अन्न खाण्यासाठी नसल्याने अन्नाच्या शोधात गावाच्या वेशीवर,शेती शिवारात,नदी,तळी,रस्ते, रानवाटा अशा ठिकाणी भटकंती करत आहेत.काही वेळा वाघ, बिबट्या हे प्राणी पाळीव प्राण्यांची बकरी ,वासरांची शिकार करतात,गावात घराच्या अंगणात, पाठीमागे शेजारी झाडावर रात्री वसलेली गावरान कोंबडे यावर हल्ला करतात. सकाळी उठल्यावर लोक कोंबड्याची सांडलेली पिसे पाहून एकमेकांशी संवाद साधताना ' राती आमचा एक कोंबडा,कोंबडी खड्यानी खाले, मग दुसरा सांगतो हवं राती खड्या रेकत होता ती मीही आयकलाता आता काय करील रानात खायाल काहीज नाय गावापर्यंत इलज ' अशा प्रकारच्या गप्पा करताना दिसतात. खड्या गवतात, झुडपात शिकारीसाठी दबा धरुन बसलेला आढळतो. अशा गावात बातम्या पसरतात वाघ किंवा बिबट्या हे प्राणी माणसाला दिसल्यावर संरक्षण करण्यासाठी त्यांच्यापासून सावध राहून सुरक्षीत अंतर ठेवून हळूहळू निघून गेले पाहिजे, हातात काठी,मोठ्या उजेडाची फोकसची बॅटरी, मोबाईल (भ्रमणध्वनीचा) संगीताचा मोठा आवाज करीत गेले तर हे प्राणी हल्ला करण्याचा प्रयत्न करत नाही रानात काम करत असताना गळ्याला मफलर गुंडाळून ठेवून काम करायला हवे शक्यतो उभ राहून काम करावे, तीन फूट उंचीच्या प्राण्यावर बिबट्या किंवा वाघ हे प्राणी जास्तीत जास्त हल्ला करतात आज जंगलाचे झाडाझुडपांचे संवर्धन करणे हे काम वनविभागाचे एकट्याचे नसून संपूर्ण डोंगराळ भागात राहणाऱ्या शेती मातीत काम करणाऱ्या मानव जातीचे काम आहे. निसर्ग हा तर अनुभव देणारा गुरुच आहे. ज्याच्या सानिध्यात राहून संपूर्ण आयुष्यातील प्रत्येक क्षण आनंदाने जगतो. शहरातील सिमेंटच्या जंगलात राहणाऱ्या मानवी समूहाला हा क्षण अनुभवण्यासाठी प्रत्यक्षरीत्या भाडे खर्च करून पर्यटनाला जावे लागते परंतु आदिवासी दरी खोरीत जीवन जगणाऱ्या बांधवांना मात्र त्याचे महत्व कमी होताना दिसते त्याचे कारण असे दरवर्षी होणाऱ्या मोठ्या प्रमाणात जंगल तोडीमुळे निसर्गाचा ऱ्हास होऊन निर्वनीकरण होण्याची संभावना तयार होताना दिसते ऋतुमानानुसार दिवस बदलत जातात पावसाळयात दिसणारी हिरवीगार निसर्गसृष्टी आणि उन्हाळयात उष्ण तापमान थंड हवेची लागणारी चाहूल हे भाव सौंदर्य दिवसेंदिवस कमी होताना दिसते . जंगल तोडीमुळे उष्णतेचे तापमान वाढत चालले आहे त्याचा परिणाम मानवालाच भोगावा लागत आहे. ह्या जंगल सृष्टीवर मानवाची जितकी मक्तेदारी आहे तितकाच हक्क वण्यप्राण्यांचा पण आहे. याची आठवण झाडावीना व पक्षावीना उजाड झालेल्या डोंगरावर जंगलात गेल्यानंतर कळते, इथल्या बुद्धिजीवी मानवाने केवळ स्वतःच्या सुखासाठी पूर्ण जंगलाची कत्तल केली आहे. त्यामुळे हिरवाईची शान नष्ट होऊन डोंगराळ भाग उजाड आणि भकास दिसत आहे. त्यामुळे रानातील पशु अन्न पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येताना आढळतात. वाघ, बिबट्या, हे प्राणी चपळ असतात अडचणीच्या ठिकाणी प्राण्यांची शिकार करतात रूवा,तरस हे प्राणी सुध्दा आदिवासी वस्तीकडे येतांना दिसतात त्यामुळे डोंगराळ भागात वृक्ष लागवड करून संवर्धन करणे प्रत्येकाचे काम आहे आणि रानातील ससे,वळीण,बाऊल,मोहोट ह्या प्राण्यांची शिकार करणे थांबवले पाहिजे.

आदिवासी डोंगराळ भागात पूर्वीतर घनदाट अरण्ये पसरले होते. त्यामुळे वेगवेगळ्या हरण (भेकर),सांबर माकड (केल्या) हे प्राणी सुध्दा रानात झाडाझुडपात भ्रमंती करताना आढळून येत होते. परंतु एकविसाव्या शतकात तसे वातावरण आता राहिलेले दिसत नाही त्याचे कारण असे आदिवासी डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात जंगलतोड होताना दिसते मानवाने स्वतःच्या कामासाठी घर बांधणे, वीट भट्टी भाजणे, इंधनासाठी लाकूड फाट्या वापरणे, वेळोवेळी लागलेले वनवे ह्यामुळे वनस्पती सृष्टी धोक्यात येऊन वाघ, बिबट्या हे प्राणी गावाच्या वेशीवर येण्याचे कारण मानवाने जंगलातील हिंस्र प्राण्यांचा ' कापर ' हा निवाराच उघडा पाडला आहे. जंगलातील बऱ्याचशा औषधी वनस्पती व डेरेदार वृक्ष नामशेष होऊन तेथील प्राणी पण दुसऱ्या रानात निघून गेले. प्राणवायू हा प्राण्यांमार्फत मिळत असतो रानावनात काम करणाऱ्या माणसाला वण्यप्राण्यांचा आवाज आला की भीती वाटत होती त्यामुळे जंगलातील शोभा वाढत असते आज जंगलात बरेचसे प्राणी नामशेष झालेले दिसतात ससा हा शाकाहारी प्राणी तुरळक प्रमाणात रानात आढळतो माकड, भालु,वळीण हे प्राणी नामशेष होन्याच्या मार्गावर आहेत ससा प्राण्याची शिकारही केली जाते .

" ससाची रसी भगरीत कशी"हे आदिवासी लोकगीत आदिवासी भागात दऱ्याखोऱ्यात कडेकपारीत जीवन जगणाऱ्या आदिवासी बांधवांना आजही अवगत आहे.आदिवासी डोंगराळ भागातील खेडूत मुलं शिकारीसाठी लाकडी बेंग्याची गल्लूर वापरतात.सश्याची शिकार करण्यासाठी वाघूर देऊन मागवाड लावतात अशी माहिती आदिवासी संशोधक सुभाष कामडी यांनी दिली आहे

## माजी ग्रहमंत्री शिवराज पाटील चाकुरकर व राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत शिरूर अनंतपाळ येथे आज जीवन गौरव सोहळ्याचे आयोजन





**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर शिरूर अनंतपाळ**
येथील साहित्य संस्कृती संवर्धन मंडळाच्या वतीने आज शनीवारी अनंतपाळ नुतन विद्यालयाचे सचिव तथा जेष्ठ शिक्षणतज्ञ प्रभाकरराव कुलकर्णी यांच जीवन गौरव सोहळा शिवराजजी पाटील चाकुरकर माजी ग्रहमंत्री भारत सरकार व राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते शनिवारी संपन्न होणार आहे.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन खा. शिवाजी काळगे,माजी खा. रूपाताई पाटील निलंगेकर,आ. विक्रम काळे,जिपचे माजी उपाध्यक्ष ॲड संभाजीराव पाटील,विवेक देशपांडे,नगराध्यक्षा चंद्रकलाताई शिवणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमासाठी तालुक्यातील व शहरातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## इंदापूर तालुका शिवसेना ठाकरे गट जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक स्वबळावर लढवणार - संजय काळे

### 26 ऑक्टोबर ला उमेदवार निश्चित करणार ?

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**
निमसाखर येथे दिनांक 19/10/2025 रोजीच्या कार्यकर्ता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने आगामी काळात होणाऱ्या पंचायत समिती जिल्हा परिषद इच्छुक उमेदवारांसाठी घेतली होते या बैठकीमध्ये आठ जिल्हा परिषद आणि सोळा पंचायत समिती गणासाठी आपले शिवसैनिकपदाधिकारी इच्छुक असल्याचे दिसून



आले काही कारणास्तव ही घेतलेली तातडीने बैठक घेण्यात आली होती पुढील बैठक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी ठरवली असून पुढच्या बैठकीसाठी यापेक्षा जास्त उमेदवार इच्छुक राहतील असे मत जिल्हा प्रमुख संजय काळे यांनी सांगितले.

या बैठकीसाठी शिवसेना पूणे जिल्हाप्रमुख संजय काळे इंदापूर तालुकाप्रमुख नितीन शिंदे तालुका समन्वयक अरुण पवार तालुका संघटक सुदर्शन रणवरे उपतालुकाप्रमुख संदीप चौधरी विभाग प्रमुख दत्ता खुडे अभिजित पाटील उपविभाग प्रमुख तुषार दळवी अरविंद आडसुळ व इतर प्रमुख पदाधिकारी व इच्छुक उमेदवार उपस्थित होते.

# सद्गुरु श्री श्री साखर कारखाना चौदाव्या गळीत हंगामासाठी तांत्रिकदृष्ट्या सज्ज

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर)**
सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेला सद्गुरु श्री श्री साखर कारखाना, राजेवाडी हा सद्गुरु श्री श्री रविशंकर जी यांच्या कृपाशिर्वादाने व प्रेरणेने उभा राहिलेला उद्योग, आपल्या चौदाव्या गळीत हंगामासाठी पूर्ण तयारीत व तांत्रिकदृष्ट्या सज्ज झालेला आहे.

कारखान्याचे महाव्यवस्थापक श्री. सत्यनारायण रेड्डी यांनी सांगितले की, शासनाच्या आदेशानुसार २०२५-२६ गळीत हंगाम एक नोव्हेंबरपासून सुरू होणार असून, सर्व मशिनरीची चाचणी पूर्ण झाली आहे व गाळपासाठी सर्व यंत्रणा तयार आहेत.

गेल्या तेरा हंगामांमध्ये कारखान्याने पारदर्शक व शेतकरी-केंद्रित कामकाजाच्या बळावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. कारखान्याच्या उपक्रमांमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाला चालना मिळाली आहे.

गत हंगामात (२०२४-२५) कारखान्याकडून ऊस दर रु. ३००० प्रति टन देण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे व दिवाळीचा सण उत्साहात साजरा करण्याचा आनंद वाढला आहे.



चेअरमन श्री. एन. शेषागिरी राव यांनी सांगितले की, "सद्गुरु श्री श्री यांच्या दया, क्षमा व समतेच्या शिकवणीप्रमाणे, कारखाना सर्व घटकांना बरोबर घेऊन यावर्षी नऊ लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट यशस्वीपणे पूर्ण करेल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे."

व्हाइस चेअरमन श्री. बाळासाहेब कर्णवर पाटील यांनीही कारखान्याची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, "कारखाना ही संस्था म्हणजे संचालक मंडळ, सभासद, ऊस उत्पादक व कामगार यांचे एकत्रित कुटुंब आहे. या मातेसमान संस्थेचा सन्मान राखण्यासाठी सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक आहे."

कार्यकारी संचालक श्री. उदय जाधव यांनी माहिती दिली की, चालू हंगामाकरिता ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणा पूर्णपणे कार्यक्षम आहे आणि सर्व शेतकरी तसेच तोडणी-वाहतूक व्यावसायिकांना यावर्षी चांगल्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया दर्शवितात की, सर्वजण "माझा कारखाना – आपला कारखाना" या भावनेने एकत्र येऊन गळीत हंगाम यशस्वी करण्यास सज्ज आहेत. सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याचे ब्रीदवाक्य "सेवा निसर्गाची, उन्नती आपली" याप्रमाणे सर्व घटकांच्या सहकार्याने यशस्वी वाटचाल पुढे सुरू राहील, असा दृढ विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## मार्लेगाव पंचायत समिती निवडणुकीत शुभम कळलावे यांची इच्छुक उमेदवारी; "कृतितून धडा शिकविण्यास सज्ज"

### मतदार राजा युवा नेतृत्वाला नक्की संधी देईल

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजु गायकवाड**
आगामी पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मार्लेगाव गटातील राजकीय वातावरण तापले आहे. या निवडणुकीत सामाजिक कार्यात सक्रीय असलेले आणि तरुण नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे शुभम कळलावे यांनी मार्लेगाव पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार म्हणून आपली तयारी जाहीर केली आहे.

शुभम कळलावे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, "मिनदे गटातील काही गद्दार नेत्यांनी मार्लेगाव गटातील विकासाचा पाया रचता रचता स्वतःच्या विकासाचा पाया रचला आहे. गावाच्या हितापेक्षा स्वार्थाला प्राधान्य देणाऱ्या अशा लोकांना कृतितून धडा शिकविण्यासाठी मी सज्ज आहे," अशी तीव्र टीका त्यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, "संगम चिंचोली ग्रामपंचायत निवडणूक आणि मेहकर विधानसभा निवडणूक या दोन्ही ठिकाणी आम्ही आपल्या वैचारिक शक्तीच्या बळावर



विजय मिळवला. गनिमी कावा रचत आणि निर्णायक नियोजन करत सिद्धार्थ खरात यांना विजयी करण्यामध्ये माझा थेट आणि महत्त्वाचा वाटा होता, याचे साक्षीदार मेहकर मतदारसंघातील अनेक महाविकास आघाडीचे नेते आहेत."तसेच त्यांनी स्पष्ट केले की, "निवडणुकीत विजय मिळवून दिल्यानंतर सिद्धार्थ खरात यांनी संपर्क कमी केला, परंतु उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रति माझी प्रामाणिक निष्ठा कायम आहे. उमरखेड्मधील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष कार्यकारिणीने माझ्या उमेदवारीस सहकार्य करावे, अशी मी विनंती करतो."

गेल्या काही वर्षांपासून शुभम कळलावे हे शिक्षण, ग्रामस्वच्छता, युवक संघटन आणि सार्वजनिक हिताच्या विविध उपक्रमांतून सतत कार्यरत आहेत. गावातील नागरिक आणि युवक वर्गाकडून त्यांच्या उमेदवारीला मोठा प्रतिसाद मिळत असून, तरुणाईत नवीन आशा आणि जोश निर्माण झाला आहे.

गावातील स्थानिकांनी व्यक्त केले की, "गावाच्या विकासासाठी प्रामाणिक आणि तरुण नेतृत्वाची गरज आहे, आणि ती शुभम कळलावे यांच्या रूपाने पूर्ण होऊ शकते."

आगामी काही दिवसांत शुभम कळलावे यांच्या प्रचाराचे नियोजन आणि अधिकृत उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता असून, त्यांच्या प्रवेशामुळे पंचायत समिती निवडणुकीत नव्या उत्साहाची लाट दिसून येत आहे.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# "वोट चोर गद्दी छोड" मोहिमेला मुदखेडमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद



**दैनिक युवक आधार**
**योगेश चौदंते मुदखेड प्रतिनिधी**

काँग्रेस पक्षाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या "वोट चोर गद्दी छोड" या राज्यव्यापी मोहिमेला मुदखेड शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या मोहिमेअंतर्गत प्रभाग क्रमांक २, भीम नगर येथून नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह निवेदन देण्यात आले.

हे निवेदन काँग्रेस तालुका अध्यक्ष प्रताप देशमुख आणि शहराध्यक्ष कैलास गोडसे यांच्या स्वाधीन करण्यात आले. या प्रसंगी इच्छुक राहुलआप्पा चौदंते, माजी नगरसेवक गौस भाई, जिल्हा उपाध्यक्ष राजू चौदंते, सचिन चौदंते तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

स्वाक्षरी मोहिमेद्वारे मुदखेड शहरातील नागरिकांनी सत्ताधाऱ्यांविरुद्धचा संताप व्यक्त करत, लोकशाहीचा सन्मान राखण्यासाठी "वोट चोर गद्दी छोड" असा नारा दिला. या उपक्रमामुळे काँग्रेसच्या मोहिमेला गावोगावी नवा जोश मिळत असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# नववर्ष नाही, तर नवचेतना; गौतम प्रतिपदा - युवाचार्य महेंद्र ऋषिजी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

नववर्ष तो नाही जो फक्त कालबद्ध बदलतो, तर तो जो आपल्या चेतनेत बदल घडवून आणतो. हा गौतम प्रतिपदा संदेश आहे. हा विचार पनवेल शहरातील कापड बाजार येथील जैन स्थानकात श्रमणसंघीय युवाचार्य महेंद्र ऋषिजी महाराजांनी गौतम प्रतिपदा आणि जैन नववर्षाच्या शुभ अवसरावर तीन दिवसांच्या तप–मौन साधनेनंतर श्रद्धालूंना मंगलपाठ आणि आशीर्वचन देताना व्यक्त केला.




त्यांनी सांगितले की कार्तिक शुक्ल एकम, म्हणजेच गौतम प्रतिपदा, आत्म-जागृती आणि नव्या सुरूवातीसाठीचा दिवस आहे. हा दिवस फक्त नवीन खात्यांची सुरुवात नाही, तर आत्म–खात्यांच्या लेख्य–जोख्याचे प्रतीक देखील आहे. या दिवशी जी व्यक्ती नव्या दिशेने पाऊल टाकते, तिच्या जीवनात शुभता, समृद्धी आणि स्थिरतेचा प्रवाह आपोआप सुरू होतो. युवाचार्यश्रींनी गौतम स्वामींच्या जीवनाचे दान, करुणा आणि पूर्णतेचे आदर्श म्हणून वर्णन केले आणि सांगितले गौतम म्हणजे जो देतो, जो जोडतो आणि जो सर्वांचा कल्याण करतो. त्यांच्या नावात कामधेनु, कल्पवृक्ष आणि चिंतामणी या तीनही भाव समाविष्ट आहेत. जीवनात जे थांबवतात, ते थांबतात; जे देतात, ते वाढतात. दान अहंकार नाही, तर आत्म-विस्ताराचा माध्यम आहे. निसर्गाचा शाश्वत नियम आहे -जितके देऊन जाल, ते त्याहून अधिक परत येईल. युवाचार्यश्रींनी भगवान महावीरांच्या निर्वाण दिनाची ऐतिहासिकता सांगितली निर्वाण हा फक्त शेवट नाही, तर नव्या युगाची सुरुवात आहे. त्याच दिवशी गौतम स्वामींना केवळ ज्ञान प्राप्त झाले आणि आर्य सुधर्मा स्वामी आचार्य पदावर आरूढ झाले. हा क्षण संघ स्थापनेचा प्रतीक बनला, ज्यामुळे जिन शासनाचा प्रवाह पुढे वाढला. त्यांनी सांगितले की संघामध्येच शक्ती, ऐक्य आणि कल्याणाचा मार्ग आहे. जेव्हा व्यक्ती किंवा कुटुंब वेगळे होतात, तेव्हा दु:ख आणि विघटन वाढते. संघाशी जोडले जाणे म्हणजे जीवनाचे उत्थान; संघापासून वेगळे होणे म्हणजे पतनाची सुरुवात. युवाचार्यश्रींनी गौतम स्वामींच्या खीरदानाची कथा सांगितली पंधराशे तपस्वींचा पारणा करताना गौतम स्वामींनी शिकवले की देण्याने कमी होत नाही, तर वाढते. दान तेव्हाच सार्थक आहे जेव्हा त्यात अहंकार नसतो आणि श्रद्धा व सन्मानाचा भाव असतो. त्यांनी वीर निर्माण संवत 2552 च्या प्रारंभाबाबत सांगितले हा फक्त तिथीचा आरंभ नाही, तर नवीन दृष्टिकोन आणि दिशा उद्घोष आहे. हा संवत प्रत्येक जिज्ञासूच्या जीवनात समृद्धी, संयम आणि सजगतेचा नवप्रभात घेऊन येईल. चातुर्मास समितीचे मंत्री अशोक बोहरा यांनी सांगितले की तीन दिवसांच्या तप–मौन साधनेनंतर युवाचार्य महेंद्र ऋषिजी धर्मसभेत पधारले, तेव्हा स्थानक जयघोषांनी गूंजले. समितीचे पदाधिकारी आणि उपस्थित श्रावक–श्राविकांनी श्रद्धा आणि भावने त्यांचे अगवानी केले, अभिनंदन केले आणि आशीर्वाद प्राप्त केला.

सभेत हितमित भाषी मुनि हितेंद्र ऋषिजी, तपस्वी मुनि धवल ऋषिजी आणि नवदीक्षित महक ऋषिजी यांनी मांगलिक पाठापूर्वी गौतम रास आणि श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रच्या अंतिम अध्यायाचे वाचन केले.चातुर्मास समितीचे अध्यक्ष राजेश बांठिया यांनी सांगितले. या संदर्भात प्रवक्ता सुनिल चपलोत यांच्याशी 9414730514 या क्रमांकावर संपर्क साधावा

# महिलांना भाऊबीज निमित्ताने १० रू मध्ये प्रवास

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर सिल्लोड**

भाऊबीज सणानिमित्त माहेरी जाणाऱ्या महिलांसाठी उंडणगाव येथील इंगळे दापत्याकडून अनोखी समाज उपयोगी सुविधा दिनांक २३ रोजी सिल्लोड बस स्थानकावर राबविण्यात आली सारोळा, लिहाखेडी, मांडणा, उंडणगाव, हट्टी मार्गावर जाणाऱ्या प्रवासी महिलांना रीना संदीप इंगळे व संदीप नारायण इंगळे वाहक एसटी महामंडळ सिल्लोड यांच्या सौजन्याने दहा रुपये देऊन वरील ठिकाणी महिलांना प्रवास देण्यात आला दहा रुपये महिलांनी द्यायचे व बाकी तिकिटाचे पैसे इंगळे दापत्याने राज्य परिवहन




महामंडळाला दिले यावेळी याबद्दल प्रवास करणाऱ्या महिलांनी आनंद व्यक्त केला संदीप इंगळे, जीवन सोनवणे, सतीश सावळे, जगदीश झंवर यावेळी उपस्थित होते.

# अनोळखी इसमाचा आढळला मृतदेह

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल परिसरात एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्यांच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

सदर अनोळखी बेवारस इसम वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे, अंगात नेसुस काळया रंगाची ट्रॅक पॅट व मळकट पांढ-या रंगाचा शर्ट घातलेला, कपाळाला व नाकाला खरचटलेले, अंगाने मध्यम असे वर्णन आहे. या



इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.

# पोलीस स्टेशन रिसोड ची उल्लेखनीय कामगिरी

## कृषी उत्पन्न बाजार समिती येथील चार अडद दुकानां फोडीच्या गुन्ह्यातील आरोपी अवघ्या 02 तासाच्या आत रिसोड पोलिसाच्या ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम:**रिसर्चेलातील कृषीतून बाजार समिती दिनांक 21 ऑक्टोंबर रोजी दीपावलीच्या रात्री चार अडत दुकान फोडण्याच्या घटनेनंतर पोलिसांनीअवघ्या दोन तासात आरोपीला पकडण्यात यश मिळवले आहे दिनांक 22 ऑक्टोंबर रोजी सकाळी 07:30 वा बाजार समितीचे सिक्युरिटी गार्ड यांनी अडकते किसन अग्रवाल यांना फोन माहिती दिली की, तुमचे अडत दुकान फुटलेले आहे.वरून फिर्यादी यांनी तात्काळ त्याचे अडत दुकान दुकानात जाऊन पाहणी केली असता दुकानाचा दरवाजा. सीसीटीव्ही कॅमेरे टेबलचा ड्रॉवर तूटलेला दिसला. अज्ञात चोरट्याने चार अडकत दुकाने फोडून त्यामधून चांदीचे शिक्के व रोख रक्कम असा एकूण 45,300 रुपये या मुद्देमाल चोरून नेला आहे. अशा फिर्याद वरून अज्ञात आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन रिसोड येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेऊन पुन्हा उघडलीच आणण्याच्या सूचना पोलीस स्टेशन रिसॉर्टचे ठाणेदार श्री रामेश्वर चव्हाण यांनी डी.वि. पथकास दिले होत्या.

त्यानंतर डी.बी पथकातील अधिकारी/



अमलदार यांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक व आधुनिक पद्धतीने आरोपीचा शोध घेऊन इसम नामे ज्ञानेश्वर भीमा पवार वय 44 वर्ष रा. समर्थ नगर, रिसोड ता. रिसोड जी, वाशिम याच दिनांक 22/10/2025 वाढोणा जिल्हा हिंगोली येथे शेत शिवारातून ताब्यात घेतल व त्यास गुण्या संबंधाने विचारपूस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी नामे ज्ञानेश्वर भीमा पवार वय 44 वर्ष, रा, समर्थ नगर ता.रिसोड जी, वाशिम यास अटक करण्यात आली असून आणखी दोन आरोपी फरार आहेत. दोन्ही फरार आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास सपोनी संतोष आघाव हे करीत आहेत. सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री अनुज तारे (IPS), मा, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड, मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक, वाशिम श्री नवदीप अग्रवाल (IPS), यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक श्री रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहा, पोलीस निरीक्षक संतोष आघाव, डी, बी , पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले पोलीस हवालदार प्रशांत राजगुरू, श्री किसन नागरे, पोलीस अंमलदार रवी अवागळे, विनोद घनवट,परमेश्वर भोने, रवी इरतकर यांनी केली आहे.

# बुलढाणा विश्रामगृह येथे किसान मोर्चा भाजपा जिल्हा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे**

**बुलढाणा :** भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा जिल्हा बैठक बुलढाणा येथे संपन्न होत असताना भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष माननीय विजयराज शिंदे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाली तसेच त्यांनी मार्गदर्शन करत असताना देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री व देशाचे प्रधानमंत्री माननीय मोदी साहेब यांच्या कार्यप्रणालीचे विस्तृत असे मार्गदर्शन सर्वांना संबंधित केले व आपले भारतीय जनता पार्टी ही कशाप्रकारे काम करते आणि इतर तळागाळातील लोकांना कशाप्रकारे मदत होते जसे की किसान निधी असो राज्य सरकार आणि केंद्र सरकारचे वार्षिक 24000 रुपये व लाडक्या बहीण वार्षिक 24 हजार रुपये अशाप्रकारे प्रत्येक शेतकरी कुटुंबास कमीत कमी वार्षिक 50 हजार रुपये मिळकत मिळते आतापर्यंत कोणत्याही सरकारने ही योजना दिलेली नाही.

तसेच घरकुल योजना तसेच आपत्ती पूरग्रस्त तसेच बाधित शेतकरी अशाप्रकारे अनेक योजना खूप अशा योजनांचा प्रस्तुत माहिती दिली तसेच मार्गदर्शन म्हणून माजी आमदार



तोताराम जी कायदे यांनी सुद्धा मार्गदर्शन केले व मुळे यांनी सुद्धा फार्मर प्रोडूसर कंपनी बद्दल मार्गदर्शन केले तसेच येणाऱ्या काळात ग्रामपंचायत असो जिल्हा परिषद असो किंवा पंचायत समिती असो या सर्व स्वराज्य संस्थांना बळकट असा भरपूर मतदान आपल्या हातात येऊ द्या व सर्वजण जोमाने कामाला लागा अशा प्रकारे सर्वांना नियुक्तीपत्र वाटप करून शुभेच्छा शुभेच्छा दिल्या. यावेळेस प्रमुख मान्यवर उपस्थित मध्ये संघटन मंत्री दत्ता पाटील' व किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष श्री चक्रधर लांडे सहकार आघाडी मोहन पवार ' साखरखेडा मंडळाचे शिवानंद वाघ ' किसान मोर्चा सरचिटणीस प्रभाकर कायदे समाधान जी मुरकुटे मारोतराव सुरवसे जिल्हा उपाध्यक्ष सखारामजी कुलकर्णी विश्वंभर जी हळदे माधराव शिराळ नागरे गजाननराव रसाळ महादेव ठाकरे गणेश राव तांगडे धनंजय जाधव प्रकाश राठोड राजूइंगोले राजाभाऊ पाखरे सुनील कोळसे निलेश धनगर भागवत पडोळ ' विश्वास मापारी बबन इंगळे रंगनाथ वरपे अनिल डुकरे राजू अंभोरे बरेचसे कार्यकर्ते उपस्थित होते

तसेच महिला आघाडीच्या सुनिता ताई आंधळे तसेच प्रसिद्धी प्रमुख रंगनाथजी सावळे मेहकर लोणार सिनखेडराजा देऊळगाव राजा चिखली मोताळा खामगाव तालुक्यातील बरेचसे कार्यकर्ते उपस्थित होते.

# कामोठे वसाहती मध्ये उभारण्यात येणार सर्वात मोठे अग्निशमन दलाचे केंद्र

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्वात मोठे अग्निशमन दलाचे केंद्र कामोठे उपनगरातील मानसरोवर रेल्वेस्थानकासमोरील चौकातील सूमारे ७ हजार चौरस मीटर जागेवर उभारले जाणार आहे. पनवेल महापालिका प्रशासनाने याबाबतच्या सर्व तांत्रिक बाबी पुर्ण केल्या असून २८ कोटी रूपये खर्च करून बांधल्या जाणा-या अग्निशमन दल केंद्राची इमारत हायटेक पद्धतीची उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया लवकरच पार पाडली जाईल.

कामोठे उपनगराची वाढती लोकसंख्या ध्यानात घेऊन येथे अग्निशमन दलाचे केंद्र उभारावे अशी मागणी येथील रहिवाशी तसेच सामाजिक संस्था आणि राजकीय संघटनांकडून वारंवार केली जात होती. या मागणीचा विचार करून सिडको मंडळाकडून मोक्याचा भूखंड मिळण्यासाठी पनवेल महापालिकेचा पाठपुरावा सुरू




होता. सिडकोकडून संबंधित भूखंड ताब्यात घेतल्यावर या भूखंडावर बांधण्यात येणा-या केंद्राच्या आराखड्यानूसार खर्चाला पनवेल महापालिका प्रशासनाने नूकतीच मंजूरी दिली. याबाबतची निविदा प्रक्रिया पार पडल्यानंतर बांधकामाला सुरूवात होईल. कामोठे येथील हे अग्निशमन दलाचे केंद्र सुरू झाल्यावर येथे दोन अग्निशमन बंबासह ४० अग्निशमन दलाचे जवान तैनात करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. या दलाच्या केंद्रामध्ये भविष्यात नवी मुंबई, सिडको मंडळ आणि पनवेल महापालिकेचे संयुक्त नियंत्रण कक्ष केंद्र (इंट्रीग्रेटेड कंट्रोल रूम सेंटर) यामध्ये उभारला जाईल. या केंद्रात आपत्ती व्यवस्थापनासह तीनही यंत्रणेचे अग्निशमन अधिकारी एकत्र बसू शकतील. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची हॉटलाईनला सुद्धा याच केंद्रातून समन्वय साधला जाईल.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून ८ किलोमीटरच्या अंतरावरील सर्वच अग्निशमनच्या यंत्रणेसोबत विमानतळ व्यवस्थापन करारबद्ध असल्यामुळे आगीच्या आपत्तीवेळी संयुक्त यंत्रणा एकामेकांना सहकार्य करणार असा हा करार असल्यामुळे या करारामुळे पनवेलच्या अग्निपंखात बळ येणार आहे. कामोठे हायटेक अग्निशमन दलाच्या बांधण्याचा पहिल्या टप्यात फायर स्टेशन आणि कार्यालयासाठी चार मजली इमारत असणार आहे. सध्या पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या सेवेत १६ अग्निशमन बंब आणि १५८ कर्मचारी व अधिकारी आहेत. कामोठे येथील नवीन अग्निशमन दल सुरू झाल्यानंतर अजून ४० ते ५० कर्मचारी वाढण्याची शक्यता आहे. अजूनही तीन बंब नव्याने खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सध्या पनवेल महापालिकेकडे सातव्या मजल्यापर्यंत उंचीवर अग्निशमन दलाचे जवान आणि बंबासह पाण्याचा मारा करता येऊ शकते अशी व्यवस्था आहे. सिडको मंडळ आणि नवी मुंबई महापालिकेकडे २२ मजल्यापर्यंत उंच अग्निबंबाचे पाणी पोहचू शकेल अशी यंत्रणा आहे.

# बोकरविडा गावातील गणेश मंदिरात रंगली दिवाळी संध्या

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

दिवाळी म्हणजे दिव्यांचा सण अंधारावर प्रकाशाचा विजय म्हणून साजरा केला जातो .आणि दिवाळी संध्या म्हणजे दिवाळीच्या वेळेची संध्याकाळ दिपोत्सव होय. दीपावली म्हणजे दिव्यांचे महत्त्व, रांगोळी, फटाके आणि मांगल्याचा सोहळा असलेला हा दिवाळी सण आणि या दिवाळी सणाचेऔचित्य साधून बोकडविरा गावचे सुपुत्र गोपाळ पाटील यांची उत्कर्ष संगीत महफिल सोमवार दिनांक २०ऑक्टोबर रोजी बोकडविरा गावातील गणेश मंदिरात रंगली .

गोपाळ पाटील म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व कला ,क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असतानाच गायन क्षेत्रात ही त्यांनी आपले भरिव योगदान दिले आहे. तसेच विविध नाट्य स्पर्धेत भाग नाट्यातील अभिनयाने त्यांनी नाट्य क्षेत्रात ही नावलौकिक मिळवले आहे .क्रीडा क्षेत्रातील कबड्डीच्या खेळावरही त्यांची पकड आहे. उत्कृष्ट वकृत्व नेतृत्व आणि आता सुरेल गायन, पहाडी आवाज म्हणून त्यांची जनमानसात ओळख आहे. राजकारणापेक्षा त्यांनी आपली कला जोपासण्याचा चंग बांधला आहे.

गेले अनेक वर्षे ते हिंदी मराठी गीतांचा



आस्वाद आपल्या श्रोत्यांना देत आहेत. त्यामुळे सोशल मीडियावर त्यांचे मोठ्या संख्येने फॉलोवर्स आहेत आपला गाण्याचा छंद जोपासून ते इतरांना गाण्याचा आनंद देत आहेत .एक नोव्हेंबर रोजी या गायन कलेचा नॉनस्टॉप गाणी गाऊन त्यांना रेकॉर्ड करायचा आहे.

सोमवार दिनांक २० ऑक्टोबर रोजी बोकरविडा गावातील गणेश मंदिरात रसिक श्रोते यांच्यासमोर झालेल्या दिवाळी संध्या या कार्यक्रमात गायिका प्रतिभाजी दक्षताजी आणि मास्टर स्वरा त्यांच्यासोबत गायक गोपाळ पाटील यांनी भावगीत ,भक्ती गीते ,हिंदी मराठी चित्रपट गीते गाऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या गायकांनी सादर केलेल्या गाण्यांना प्रत्येक गाण्याला प्रेक्षकांनी भरभरून दात दिली बोकरवीडा ग्रामस्थ आणि ग्राम सुधारणा मंडळा कडून या कार्यक्रमासाठी गोपाळ पाटील यांना सहकार्य मिळाले. गोपाळ पाटील आणि त्यांच्या सहकारी गायिकांनी गायलेल्या प्रत्येक गाण्यांना भरभरून टाळयांचा प्रतिसाद मिळत होता .आणि या कार्यक्रमात रंगत आणली ती दर्शना माळी यांच्या बहारदार सूत्रसंचालनाने त्यामुळे कार्यक्रमाने उंची गाठली.

या कार्यक्रमासाठी बोकरविडा ग्रामस्थ, कामगार नेते कॉम्रेड भुषण पाटील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# बहुजनांनी महासम्राट बळीराजांच्या इतिहासाशी स्वत:ला जोडले पाहिजे

## उमरखेड शहरात महासम्राट बळीराजा यांची भव्य गौरव यात्रा

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजु गायकवाड**

आज बलिप्रतिपदा! आजच्या दिवशी बळीराजा आपल्या प्रजेला भेटायला येतो असे मानले जाते. या दिवशी आपल्याकडील सर्व दुःख बाजूला ठेवून आपल्या राजाचे स्वागत केले जाते.गोड पदार्थ नवीन कपडे,, रोषणाई केली जाते. आजही ग्रामीण भागात माताभगिनी आपल्या घरातील पुरुषांना ओवाळताना "इडा पीडा टळो, बळीचे राज्य येवो" अशी प्रार्थना करतात.



महात्मा फुले बळीच्या राज्याचा म्हणजेच आपल्या देशाचा उल्लेख "बळीस्थान" असा करतात म्हसोबा खंडोबा, काळभैरव जोतिबा, मार्तंड मल्हारी , बिरोबा, भैरोबा,भराडी इत्यादि बळीराजाच्या राज्याचे सरदार होते, ज्यांना आपण आपले कुलदैवत मानतो.

बळीराजाचा इतिहास व्यापक आहे, तो हळूहळू समोर येत आहे. एकेका गोष्टीचा उलगडा होत आहे. जागरूक झालेले लोक बलिप्रतिपदेच्या दिवशी कार्यक्रम आयोजित करू लागले आहेत. याचाच एक भाग म्हणून उमरखेड शहरात महानायक महासम्राट बळीराजाच्या गौरवयात्रेच् आयोजन करण्यात आले.

साक्षात छत्रपती शिवाजी महाराजांपुढे बळीराजाचा आदर्श होता. शिवरायांनी शेतकऱ्यांची घेतलेली काळजी पाहून हे मनोमन पटतं की जिजाऊ मातेनं त्यांना बालपणापासून बळीराजाच्या कार्याची महती सांगितली असावी.

या भव्य गौरव यात्रेची सुरवात राजे संभाजी उद्यानापासून झाली. शहरातील राजे संभाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना हारार्पण करत सोनार लाईन- नाग चौक- माहेश्वरी चौक – बाजार समिती मार्गे जिजाऊ भवन येथे गौरव यात्रेचा समारोप झाला

समारोपीय कार्यक्रमात अमृत पॅटर्न चे जनक अमृतराव देशमुख यांचे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य वि.ना. कदम सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुधीर देशमुख माजी नायब तहसीलदार, देवानंद मोरे अध्यक्ष महासम्राट बळीराजा महोत्सव समिती उमरखेड,चक्रधरराव देवसरकर राष्ट्रीय किसान मोर्चा,शिवाजीराव वानखेडे, अध्यक्ष मराठा सेवा संघ उमरखेड, लेखिका रत्नमाला साहेबराव धात्रक,बालाजीराव वानखेडे सचिव बळीराजा महोत्सव समिती हे होते कार्यक्रमाचे संचलन सुरेशराव कदम मराठा सेवा संघ यवतमाळ जिल्हा यांनी केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने शेतकरी कष्टकरी व नागरीक उपस्थित होते.

# पनवेल परिसरात एकाच दिवसात लागल्या दोन ठिकाणी आग

## अग्निशमन विभागाच्या तत्परतेने इसमाचा जीव वाचला

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

पनवेल परिसरात एकाच दिवसात दोन ठिकाणी आग लागल्या. मात्र अग्निशमन विभागाच्या तत्परतेने इसमाचा जीव वाचला आहे.





पनवेलजवळील पळस्पे फाटा परिसरात एका गळ्याला अचानक आग लागून मोठे नुकसान झाले आहे. पळस्पे येथील दत्ता स्नॅक्सजवळ असलेल्या पीके वाईन्स शेजारील या गळ्याला आग लागल्याची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. आगीमुळे या परिसरात दाट धुराचे लोट पसरले होते, ज्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी रवाना झाले.

त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून काही वेळातच आग आटोक्यात आणली, अन्यथा मोठे संकट ओढवले असते. तर दुसऱ्या घटनेत नवीन पनवेल सेक्टर-4 मधील कॉटेज एन.जी. प्लॉट क्र. 89 येथील इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर आज दुपारी आग लागण्याची घटना घडली. सदर आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन विभागाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळी पोहोचल्यावर गॅलरीतून मोठ्या प्रमाणात ज्वाळा आणि धूर बाहेर पडत असल्याचे दिसून आले. परिस्थिती गंभीर असल्याने दरवाजा हातोड्याच्या सहाय्याने तोडून जवानांनी घरात प्रवेश केला. पाणी मारून आग नियंत्रणात आणली. दरम्यान, किचनमध्ये एक पुरुष बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. जवानांनी कोणताही विलंब न करता त्याला सुरक्षित बाहेर काढत ॲम्बुलन्सच्या मदतीने तातडीने पुढील उपचारासाठी रवाना केले.

त्याचबरोबर इमारतीच्या वरच्या मजल्यावर अडकलेल्या एका कुत्र्याला ही अग्निशमन दलाने यशस्वीपणे रेस्क्यू करून सुरक्षित बाहेर काढले.

# जुन्या आठवणींना उजाळा २००३ च्या बॅचचा स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव :** जिल्हा परिषद शाळा सोयगाव येथील २००३ च्या बॅचचा स्नेहसंमेलन सोहळा अगस्ती मुनि वारकरी संप्रदाय आश्रम शाळा येथे मोठ्या उत्साहात पार पडला.या सोहळ्याने शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.

बालपणीच्या शाळेतील गमती-जमती, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मित्रमंडळींच्या आठवणींनी वातावरण भावनिक झाले.

या स्नेहसंमेलनास सुमारे १०० ते १२५ माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. यामध्ये रविराज काळे, सतीश बोडखे,संदीप गव्हाडे, प्रदीप चौधरी,

अमोल पाखरे,अमोल कायस्त,सतीश रावणे, सचिन गिरी,गजानन ढगे,मंगेश सोहनी,हितेश कुलकर्णी, दीपक काळे,

सोपान पाटील, समाधान इंगळे यांच्यासह विद्यार्थ्यांनी हर्षला कोलते,ममता खस,उषा चौधरी, मंगला सोनवणे या विद्यार्थिनींचा उत्साही सहभाग लक्षणीय होता.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून



**२००३ बॅचचे माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षक मंडळी अगस्ती मुनि आश्रम शाळेत एकत्र येऊन जुन्या आठवणींना दिला उजाळा**

मा.मुख्याध्यापक लक्ष्मणराव रोकडे, शिक्षक गणेश जगताप,जगदीश जगताप,के. के.फुसे, आर.एल.फुसे,चौधरी मॅडम यांची उपस्थिती लाभली.माजी शिक्षकांचा विद्यार्थ्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत,"शिकवलेले धडे आयुष्यात फळाला आले हेच आमचं समाधान,"अशी भावना व्यक्तकेली.स्नेहसंमेलनादरम्यानविद्यार्थ्यांनी आपआपले अनुभव कथन केले.विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांनी शिक्षणानंतरच्या प्रवासाची माहिती दिली. हास्य-विनोद,गाणी,गप्पा,फोटोसेशन आणि सामूहिक भोजनामुळे वातावरण आनंदी झाले.जुन्या सहाध्यायांना भेटून सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता.या स्नेहसंमेलनाने जुन्या नात्यांना नवसंजीवनी दिली.सर्वांनी पुढील वर्षी पुन्हा भेटण्याचा निर्धार व्यक्त करत "शाळा आपली– आठवणी सोन्याच्या" अशी भावना व्यक्त केली.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या अद्वितीय कार्याचा गौरव आणि प्रेरणा सदैव जागृत ठेवण्यासाठी शिवस्मारक महत्त्वाचे - संपत गारगोटे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ देवेंद्र ओव्हाळ**
**खेड पुणे**

औंढे,तालुका खेड,जिल्हा पुणे येथे भव्य शिव स्मारक भूमिपूजन सोहळा शिवव्याख्याते संपत गारगोटे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला यावेळी प्रसिद्ध व्याख्याते संपत गारगोटे यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमासाठी घोटवडीचे मा. सरपंच सुनील धंद्रे, वंचित बहुजन आघाडीचे खेड तालुका कार्याध्यक्ष दत्ता कांबळे, औंढेचे सरपंच प्रदीप शिंदे,उपसरपंच निलेश यादव, यात्रा कमिटीचे अध्यक्ष दत्ता शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष सतीश शिंदे, मुंबई मंडळाचे अध्यक्ष राम शिंदे, उद्योजक पप्पू शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा स्वाभिमान, पराक्रम, शौर्य, त्याग, समता व न्यायाचा असून प्रत्येकाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारानुसार आचरण केल्यास स्वतःची, समाजाची व देशाची प्रगती आपण करू शकतो यासाठी शिवनिती आत्मसात करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन संपत गारगोटे



यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराजांची आठवण आपल्याला सदैव होते. त्याची विविध कारणे आहेत. सत्ता हाती आल्यानंतर ती सामान्यांसाठी वापरायची असते. याचा आदर्श त्यांनी निर्माण केला. या देशात राजे-रजवाडे अनेक होऊन गेले. आपण कधी मुघलांचे नाव ऐकले, कधी आदिलशाही चे नाव ऐकले तर कधी अन्य राज्यांचे नाव ऐकले. मात्र छत्रपती शिवाजी महाराज असे एकमेव राजे आहेत की, ज्यांचे राज्य कुटुंबाच्या नव्हे तर रयतेच्या नावाने स्थापन झाले होते. तसेच शिवाजी महाराजांनी रयतेच्या सुखासाठी आणि जनतेच्या कल्याणासाठी राज्यकारभार केला म्हणूनच आजही शिवाजी महाराजांचे कार्य आणि विचार येथील प्रत्येकाला प्रेरणादायी ठरतात. जेव्हा आपण संकटात असेल शिवाजी महाराजांचा इतिहास आठवल्यानंतर प्रत्येक संकटावरती यशस्वी मात करण्यासाठी जो आत्मविश्वास लागतो तो आम्हाला पदोपदी मिळतो. आजही शिव स्मारकातून प्रेरणा मिळते व असे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक खेड तालुक्यातील पश्चिम पट्ट्यामध्ये भव्य स्वरूपात उभे राहत ते ही सर्वसामान्य माणसांनी लोकवर्गणीतून उभे करत आहात हे कौतुकास्पद आहे असे संपत गारगोटे यांनी नमूद केले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे भव्य अशी मिरवणूक काढून प्रतिमेचे पूजन करून अतिशय उल्हास पूर्ण वातावरणामध्ये शिवस्मारकाच्या उद्धाटनाचा सोहळा संपन्न झाला यावेळेस या कार्यक्रमासाठी सूत्रसंचालन दत्ता शिंदे यांनी तर आभार घोटवडीचे मा. सरपंच सुनील धंद्रे यांनी मानले '

# खांदेश्वर पोलीस ठाण्यावर ब्लॅक पॅंथर संघटना कडून; २८ ऑक्टोबर डेड लाईन

## साळवी व गमरे यांना न्याय न मिळाल्यास चक्का जाम - जगदीश भाई गायकवाड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल बौद्धजन पंचायत समितीचे शाखा क्रमांक ८६६ संदीप मोहन साळवी व प्रथमेश प्रकाश गमरे सचिव यांच्यावर आकुर्ली येथे जातीयवादी विचारांच्या ५० ते ६० लोकांनी भयाड हल्ला केल्याचे आरोप करीत ब्लॅक पॅंथर संघटनेचे नेते माजी उपमहापौर जगदीश भाई गायकवाड यांनी पॅंथर योद्धे व शेकडो भीम बांधवांच्या सोबत जोरदार घोषणाबाजी करीत खांदेश्वर पोलीसठाणे गाठले . यावेळी बहुसंख्येने उपस्थित बहुजन समाजातील आंदोलनकर्त्यांचे प्रतिनिधित्व माजी नगरसेविका विद्या गायकवाड यांनी करून जोरदार विरोध प्रदर्शन करीत प्रशासनाला अंकुशात्मक सूचक इशारा हि दिला . पायी निघालेल्या आंदोलना ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवल्याने आंदोलन शांततेत पार पडले.

त्यावेळी पोलीस प्रशासनाने सदर पीडितांची मागणी समजून घेत या प्रकरणी निःपक्षपाती पणे कारवाई केली



जात आहे, कायदा हातात घेणाऱ्या अन्य आरोपींना लवकरच अटक केली जाईल व चौकशी करून कठोर शिक्षा व्हावी यासाठी कलमे लावले जातील असे आश्वासन दिले. मोर्चाचे नेतृत्व करणारे जगदीश गायकवाड यांनी पोलिसांनी सांगितल्यानुसार आम्ही अटकेसाठी दोन दिवस अधिक वेळ देत आहोत , आमच्या कडून हि सहकार्य असेल असे सांगत पनवेलकरांच्या शिवभूमित असे जातीयवादी आरोपी कठोर कलमे खाली अटक झाले पाहीजेल व त्यांना तडीपारी सारखी कठोर शिक्षा व्हावी यासाठी कारवाई केली पाहीजेल म्हणून प्रमुख मागणी केली व पुढे म्हणाले की आमच्या आगरी आणि सागरी लोकांच्या मनात विष पेरणाऱ्या समाजकंटकांच्या विरोधात आमची शिव तलवार उत्तर देण्यासाठी तयार असून या घटनेची माझ्या तालुक्यात पुनरावृत्ती न व्हावी यासाठी आताच पाऊले उचलावीत व छुपे कट रचणारे परप्रांतीय व अन्य कोणी जातीयवादी हेतू परस्पर असे प्रकार घडवत असेल तर त्यांना ब्लॅक पॅंथर कडून जशाच तसे उत्तर दिले जाईल असे सांगत सूचना वजा इशारा हि दिला. यावेळी आंदोलनकर्त्यांचा रोष अधिक तीव्र होताना दिसत होता त्यांना शांतता राखावी असे सांगत जगदीश गायकवाड यांनी तीव्र शब्दात भ्याड हल्ले खोरांचा समाचार घेत या प्रकरणाची प्रशासनाने सखोल चौकशी करावी असे सांगितले.

यावेळी माजी नगरसेविका विद्या गायकवाड यांनी पोलिसांनी आश्वासन दिल्या प्रमाणे तात्काळ कार्यवाही व्हावी, जातीय सलोखा ठिकावा अन्यथा पुढे चक्का जाम आंदोलन केले जाईल असा इशारा दिला. पीडित साळवी व गमरे परिवाराने आपल्या मागण्या सांगत आम्ही समाज बांधव अनेक दिवस शांततेच्या मार्गाने न्याय मागत असून आमची लढाई आमच्या हक्क , अधिकाराची आहे .त्यासाठी विलंब होत असून आम्हाला पोलीस प्रशासनाने लवकरात लवकर न्याय मिळवून द्यावा व अल्पसंख्याक समाज बांधवांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास कायम रहावा यासाठी सहकार्य करावे असे सांगितले.

या संपूर्ण प्रकरणाची दखल खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी घेऊन उपस्थित अनेक सामाजिक संस्थेचे निवेदन पत्र स्वीकारले आणि नागरिकांनी कायदा ,सुव्यवस्था ठिकावी , सामाजिक सलोखा रहाव यासाठी आव्हान केले. या नंतर पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येणार नाही, पोलीस प्रशासन तातडीने कारवाई करत असून लवकरच फरार आरोपींना अटक करून कायदा मोडणाऱ्यांची कसलीही गय केली जाणार नाही असे सांगितले.यावर उपस्थित शेकडो आंदोलन कर्त्यांनी टाळ्या वाजून पोलीस प्रशासनाचे आभार मानून आंदोलन शांततेत पार पाडले.

पिडित साळवी व गमरे परिवारा ने ब्लॅक पॅंथरच्या सर्व संघटनेचे व भाई जगदीश गायकवाड व विद्याताई गायकवाड यांच्या सर्व समर्थकांचे आभार मानले.

# मुदखेड व्यापारी असोसिएशनतर्फे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचा सत्कार



**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड**

दीपावलीच्या पार्श्वभूमीवर मुदखेड व्यापारी असोसिएशनतर्फे पानसुपारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकरावजी चव्हाण साहेब मुदखेड शहरात आगमन झाल्याने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

या सत्कार प्रसंगी नितीन भाऊ चौदंते व त्यांचा मित्रपरिवार, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी व शहरातील मान्यवर उपस्थित होते. चव्हाण साहेबांचे पुष्पगुच्छ, शाल-श्रीफळ देऊन मनपूर्वक स्वागत करण्यात आले.

साहेबांनी व्यापारी असोसिएशनच्या कार्याची माहिती घेतली तसेच सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साही व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# खास लोकाग्रहास्तव मुंबईकर रसिकांसाठी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर येथे 'कोकणचा साज संगमेश्वरी बाज'

## अर्चना थिएटर्स निर्मित,समर्थ कृपा प्रोडक्शन प्रस्तुत रविवार दि.२६ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्रौ ०७. ३० वा.प्रयोगाचे आयोजन

**युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

बोली भाषेमधील गोडवा आगळाच असतो.प्रमाणभाषेची गरज मान्य करूनही त्याचे सतत तुणतुणे वाजवणा-यांना बोलीभाषेचा गोडवा कळत नाही. त्यातील थेट भाव आणि व्यक्तहोण्याचा रोखठोकपणा शिवाय लडिवाळपणा ही गंमत असते. 'संगमेश्वरी बोली'मध्ये हे सारे एकवटले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर ते खेड भागातील या बोलीभाषेला तसे दुय्यमच मानले जात होते. मात्र, आधी आनंद बोंद्रे यांच्या एकपात्री प्रयोगातून आणि आता 'कोकणचा साज संगमेश्वरी बाज' या लोकनाटय़ातून ही बोली प्रवाही होते आहे. याच संगमेश्वरी बोलीतून जाकडी,नमन,भजन अशा कोकणी लोककला लोकनाटय़ाच्या फॉर्ममधून सादर करणा-या 'कोकणचा साज संगमेश्वरी बाज' लोकनाटय़ाने अवघ्या तीन वर्षात ४५० हुन अधिक प्रयोग सादर केले आहेत.कोकणी लोककलेचा हा ख-या अर्थाने सन्मानच म्हणावा लागेल.




कोकणला मोठी सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे.निसर्गसौंदर्य,आंबा, काजूसारखी फळे, अनेकविध सण, उत्सव, प्रथा यांच्यासोबत बोलीभाषा ही कोकणची वैशिष्ट्ये आहेत. विशेष उल्लेख करता येईल तो ग्रामीण ढंगाच्या संगमेश्वरी बोलीचा. समर्थ कृपा प्रॉडक्शनच्या टीमने 'कोकणचा साज संगमेश्वरी बाज' या लोकनाटय़ाची निर्मिती करताना संगमेश्वरी भाषेला लोकमान्यता मिळवून देण्याचा एक यशस्वी प्रयत्न केला आहे. तात्या गावकर हा या कथासूत्राचा तथा लोकनाटय़ाचा प्रमुख आहे.कोकणातील लोककला, संस्कृती जाणून घेऊन त्यावर 'डॉक्युमेंटरी' करण्याच्या इराद्याने येणारा मुंबैकर गावातील इरसाल पात्रांना कसा सामोरा जातो, हे पाहणे खूपच मजेशीर आहे. विविधरंगी पात्रांच्या संगतीने मुंबैकर गावातील प्रथा, परंपरा, कला, संस्कृती जाणून घेताना भारावून जातो. विनोदी संवादांतून कोकणातील लोकांच्या मनातील सलही तात्या गावकर आणि मंडळी लोकांपुढे मांडण्यात यशस्वी झाले आहेत. बक्कळ पैसा कमावण्याच्या ओढीने गावातील तरुण मंडळी मोठय़ा शहरांकडे धावतेय.

त्यामुळे गावातील संस्कृती, कला लोप पावतेय की काय,ही प्रबोधनात्मक संवादांतून प्रखरपणे मांडलेली ही गावक-यांची मनातील भीती अंतर्मुख करून जाते. गावातील जमीनजुमला येईल त्या किमतीला विकून पैसा कमावण्याचा फंडा सध्या सर्वत्र आहे. मात्र, त्याच जमिनीवर उभ्या राहणा-या उद्योगावर मजुरी करण्याची पाळी स्वत:वर येऊ देऊ नका, ही कळकळीची विनंती करताना ही गावकर मंडळी भविष्यातील कोकणाचे भयान रूपच जणू रसिकांसमोर मांडतात आणि सगळे स्तब्ध होतात.

'कोकणचा साज संगमेश्वरी बाज'ला मुलुंड येथे झालेल्या ९८ व्या मराठी नाटय़ संमेलनाच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण व्यासपीठ मिळाले. त्यावेळी उपस्थित रसिक आणि कलावंतांनी उभे राहून या टीमला दाद दिली कौतुक केले.त्यानंतर कोकणमध्ये एका पाठोपाठ एक प्रयोगांचा सिलसिला सुरू झाला. तीन - चार वर्षात सुमारे ५२५ हुन अधिक प्रयोगांचा टप्पा गाठणा-या या लोकनाटय़ाचा पहिला व्यावसायिक प्रयोग परळ (मुंबई) येथील दामोदर हॉलमध्ये मुंबईकर रसिकांच्या हाऊसफुल्ल प्रतिसादात झाला.त्या नंतर सतत मुंबई सह कोकण आणि अन्य भागात पुढील काही प्रयोग होणार आहेत.मुंबईकर कोकणवासीयांनी या लोकनाटय़ाचे कौतुक केले आहे.

कोकणी लोककला टिकाव्यात.त्या नव्या पिढीकडे हस्तांतरित व्हाव्यात.बोलीभाषा टिकावी.तसेच भाषा बोलण्याचा संकोच दूर व्हावा, हा आमचा प्रयत्न आहे.असे प्रतिपादन ह्या लोकनाट्य मधील तात्या गावकर,उत्तम गायक/कलाकार सुनील बेंडखळे यांनी केले आहे.म्हणूनच या दर्जेदार प्रयोगाचे आयोजन अर्चना थिएटर्स निर्मित,समर्थ कृपा प्रोडक्शन प्रस्तुत रविवार दि. २६ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्रौ ०७. ३० वा. छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर, दादर ( प. ) येथे 'कोकणचा साज संगमेश्वरी बाज'सादर होणार आहे.अधिक माहितीसाठी दिपक कारकर - ९९३०५८५१५३/९६५३३२३७३३ भारती एस - ९४०४८६७९६७ यांच्याशी संपर्क साधून,मनोरंजनाची परिपूर्ण हमी असणाऱ्या या प्रयोगाला भरभरून प्रतिसाद द्या असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.


# दसपटीचे प्रतापराव शिंदे यांचा कर्तृत्व, क्रीडा आणि कर्तव्यनिष्ठेचा हिरक महोत्सवी प्रवास

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण:-(प्रमोद तरळ)**

काही व्यक्ती आपल्या कार्याने, समर्पणाने आणि सेवाभावाने समाजाच्या अंतःकरणात कायमचे स्थान निर्माण करतात. अशा व्यक्तिमत्त्वांपैकी एक तेजस्वी नाव म्हणजे दसपटी विभागातील पेढांबे गावचे सुपुत्र प्रतापराव शिंदे... शिक्षण, कला, क्रीडा, समाजकार्य आणि राजकारण या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय ठसा उमटवणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. त्यांच्या व्यक्तित्वात शिस्त, जिद्द, प्रामाणिकता आणि लोकसेवेची निष्ठा एकवटलेली आहे.

प्रतापराव यांचे प्राथमिक शिक्षण जि.प. आदर्श शाळा पेढांबे येथे, तर माध्यमिक शिक्षण अलोरे हायस्कूल येथे झाले. बालपणापासूनच त्यांच्यातील कर्तृत्वाची झलक शिक्षकांच्या नजरेत आली होती. शिक्षणासोबतच त्यांनी कबड्डी या मातीतल्या खेळात अप्रतिम कौशल्य दाखवत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या चिकाटीने आणि क्रीडावृत्तीने त्यांना मुंबई पोलीस दलात भरती होण्याची संधी मिळाली आणि याच क्षणापासून त्यांच्या जीवनातील नवा अध्याय सुरू झाला.

मुंबई पोलिस सेवेत कार्यरत असताना त्यांनी केवळ आपली कर्तव्यनिष्ठा सिद्ध केली नाही, तर कबड्डीच्या मैदानावरही संघाचे नेतृत्व करत असंख्य खेळाडू घडवले. मुंबई पोलिस कबड्डी संघाचे कर्णधार व प्रशिक्षक म्हणून त्यांनी संघाला नवे यश मिळवून दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक तरुणांनी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर विजेतेपद मिळवले. क्रीडाविकासाच्या वाटचालीत त्यांनी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी कार्यकारणी सदस्य तसेच मुंबई उपनगर



कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आणि कबड्डीच्या प्रगतीसाठी अविरत प्रयत्न केले. त्यांच्या क्रीडाभक्तीमुळे अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळाली आणि कबड्डीला नवी प्रतिष्ठा लाभली.

नोकरीच्या जबाबदाऱ्यांमध्ये गुंतूनही त्यांनी आपला समाजकार्याचा ध्यास सोडला नाही. आपल्या पेढांबे या मूळ गावी त्यांनी अनेक उपक्रम राबवून गावाच्या विकासाला चालना दिली. श्री रामवरदायनी मंदिर देवस्थानाचे सलग दहा वर्षे अध्यक्ष म्हणून त्यांनी मंदिर परिसराचे सुशोभीकरण, रस्ते, पाणीपुरवठा, शाळा उभारणी, तसेच पेढांबे गावची ग्रामदेवता श्री सुकाईदेवी मंदिराच्या पुनर्बांधणीसारखी अनेक उल्लेखनीय कामे केली. त्यांच्या नेतृत्वामुळे गावात केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक एकतेचा भावही दृढ झाला.

समाजकार्याची प्रेरणा त्यांना त्यांचे आजोबा कारभारी तानाजीराव शिंदे, चुलते मधुकरराव शिंदे आणि बंधू बाबारामराव शिंदे यांच्या कार्यातून लाभली. या संस्कारवृक्षाच्या छायेखाली वाढलेल्या प्रतापराव शिंदे यांनी जनसेवा हेच जीवनाचे ध्येय मानले. त्यांनी समाजासाठी केलेली प्रत्येक कृती ही नि:स्वार्थ, सच्च्या सेवाभावातून प्रेरित होती.

त्यांच्या कार्याचा परीघ समाजसेवेपुरताच मर्यादित राहिला नाही. राजकारणातही त्यांनी निष्ठेने पाऊल टाकले आणि शिवसेना पक्षात तालुकाप्रमुख, पंचायत समिती सदस्य, उपसभापती तसेच उपजिल्हाप्रमुख या जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या. त्यांचे नेतृत्व जनतेच्या विश्वासावर आधारित होते, आणि त्यांच्या काळात अनेक विकासकामांना गती मिळाली. राजकारण त्यांच्यासाठी सत्तेचा मार्ग नव्हता, तर सेवेचा साधनमार्ग होता.. आणि हाच त्यांचा वेगळेपणा ठरला.

प्रतापराव शिंदे यांचे आयुष्य म्हणजे परिश्रम, प्रामाणिकता आणि जनसेवेचे सुंदर मिश्रण आहे. त्यांचा प्रत्येक दिवस समाजाच्या भल्यासाठी आणि पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरावा, अशी त्यांची जीवनशैली आहे. त्यांच्या वर्तनातील साधेपणा, विचारातील परिपक्वता आणि कृतीतील प्रामाणिकता हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

बुधवार दि. २२ ऑक्टोबर २०२५ रोजी वाढदिवस असणाऱ्या सन्माननीय प्रतापराव यांच्या षष्ठब्दिपुर्ती जिवनाची अशी आहे ही गाथा यशोदिपाची.

अशा बहुगुणी, क्रीडाप्रेमी, समाजहितैषी आणि नेतृत्वगुणांनी संपन्न व्यक्तिमत्त्वाचा गौरव करणे हीच खरी कृतज्ञतेची भावना ठरेल. त्यांच्या साठाव्या (हिरक महोत्सवी) वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांचे पुढील जीवन आरोग्यदायी, आनंदमय आणि समाजसेवेच्या नव्या अध्यायांनी उजळत राहो. अशी मनोकामना परिसरातील जनतेने व्यक्त केली आहे

# पंढरीपुल एमआईडीसीतील कामगाराच्या प्रश्नासाठी कॉंग्रेस झाले आक्रमक

## अहिल्यानगर सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात बैठकिचे आयोजन

**नेवासा प्रतिनिधी**
**लखन वाल्हेकर**

नेवासा तालुक्यातील पांढरीपूल एमआईडीसीतील कामगाराच्या प्रश्नाबाबत अहिल्यानगर येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात कामगार आयुक्ताच्या उपस्थितीत कॉंग्रेस पदाधिका-यासोबत एमआईडीसी प्रशासनाबरोबर आज बैठक घेण्यात आली.

पांढरीपुल एमआईडीसीतील कामगारांच्या विविध प्रश्नाबाबत कॉंग्रेस पक्षाने आक्रमक भूमिका घेतली होती. अहिल्यानगर सहाय्यक कामगार आयुक्ताकडे वेळोवेळी निवेदनाद्वारे तक्रारी करत आंदोलनाचा ईशाराही दिला होता. या प्रश्नामध्ये प्रामुख्याने येथील उद्योगात स्थानिक तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या मागणी बरोबरच येथील उद्योगात कार्यरत असणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न, कामगाराचा पोशाख, बूट, मेडिकल, कामगारासाठी करार केलेले हॉस्पिटल, ट्रान्सपोर्ट सुविधा, तसेच कामगारांचा विमा,ऍक्सीडेन्ट झालेल्या कामगारांना मिळणारी नुकसान भरपाई याशिवाय कॉन्ट्रक्ट बेसवर काम करणाऱ्या कामगारांच्या किमान वेतनाचा प्रश्न येथील उद्योगामुळे होणारे जल व वायू प्रदूषण,या सर्व प्रश्नाबाबत कॉंग्रेसने आक्रमक भूमिका घेतल्याने आज अहिल्यानगर येथील कामगार कार्यालयात या सर्व प्रश्नाबाबत कपंनी प्रशासणाबरोबर बैठक घेण्यात आली. यावेळी सहाय्यक कामगार आयुक्त यांनी तातडीने या प्रश्नाबाबत पंधरा दिवसाच्या आत आपले लेखी म्हणणे सादर करण्याचे आदेश कंपनी प्रशासनास दिले. यावेळी कामगारांच्या वेतनाच्या प्रश्नाबाबत मागील तीन



महिन्याचा डेटा उपलब्ध करून देण्याचा आदेश देण्यात आला तसेच येथील उद्योगात किती प्रमाणात स्थानिक कर्मचारी समावेश केला आहे याची यादी देखील सादर करण्याचे आदेश दिले आहे. कुठल्याही स्थितीत हलगर्जीपणा केल्यास कारवाई केली जाईल अशी स्पष्ट भूमिका सहाय्यक कामगार आयुक्त यांनी मांडली. या बैठकीत पांढरीपुल एमआईडीसीतील गेलेक्सि लेबोरेटरी, पारस, अल्फा लाईट, सीपीएफ इंडिया,तिवाना नुट्रीशीयन या उद्योगातील एचआर मॅनेजर सहभागी झाले तसेच महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे कामगार विभागाचे संभाजी माळवदे, छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे, युवा नेते हरीश चक्रनारायण, शहराध्यक्ष अंजुम पटेल आदी सहभागी झाले.

**"स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून द्या"**

**कॉंग्रेस पक्ष कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी काटीबद्ध असून कुठल्याही परिस्थितीमध्ये कामगारावर अन्याय होऊ देणार नाही. त्यांच्या प्रश्नासाठी लढा देणार याबरोबरच स्थानिक तरुणांना येथील उदयोगामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी आक्रमक भूमिका घेणार, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करू न दिल्यास उद्योग चालू देणार नाही.**

**- संभाजी माळवदे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी.**

# निगुतीने कोरलेली अक्षरलेणी : 'अवतरण चिन्ह'




लिहित्या हातांच्या गर्दीत कायम आपली स्पर्धा ही आपल्याशीच असते. या गर्दीत उठून दिसण्यासाठी आवश्यक असते ते लेखनातील सातत्य! वाचा अधिक लिहा नेमके. इथला असा हा सवतासुभा असतो. इतरांसारखे किंबहुना, पेक्षा थोडे वेगळे, प्रभावी आपले लिखाण असावे अशी महत्त्वाकांक्षा काही लोक बाळगून असतात. त्यांच्या त्या धडपडीला अन् तपश्चर्येला हे सारे दागिने शोभून दिसत असतात. लेखन अन् त्याला व्याकरणाची योग्य सांगड! एकदा का हे तंत्र विकसित करता आले तर वाचकांना खिळवून ठेवण्यासारख्या रचना जन्मास येतात. किती लिहिले पेक्षा काय लिहिले ते कसोटीवर लागत असते. कवी/ गझलकार, प्रवीण बोपुलकर यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला 'अवतरण चिन्ह' हा कविता संग्रह वाचणांत आला. एक परिपूर्ण कवितासंग्रह म्हणून त्याची नोंद घेणे इष्ट ठरेल.

एकेरी अवतरण चिन्ह आणि दुहेरी अवतरण चिन्ह! आता, हे नेमके कोणते आहे हे वाचकांनी ठरविलेले कधी ही बरे! मला, या दोन्हींचा सुवर्णमध्य साधलेला इथे दिसतो. मंत्रमुग्ध करते म्हटल्यापेक्षा मनाला वेड लावणारे शब्द म्हणजे कविता! अंतर्मुख करते ती कविता! अन् हे सारे तपासून पहायचे असेल तर प्रवीण बोपुलकर यांचा कविता संग्रह, 'अवतरण चिन्ह' आवर्जुन वाचावाच लागेल. पाण्यात उतरल्याशिवाय त्याची खोली कळत नाही. अगदी तशातला हा प्रकार आहे. कविता, गझल, गीत असा हा संमिश्र अविष्कार आहे. काही गझलसदृश्य रचना, मुक्तछंद वाचकांस गुंतवून ठेवण्यास पुरेशा आहेत.

प्रवीण बोपुलकरांच्या 'अवतरण चिन्ह' या कविता संग्रहात काही हटके शब्द वाचायला मिळतील. वाचताना सुरुवातीला अवघडल्यासारखे होईल. एकदा का लय पकडली की मग सारे माहितीतले शब्द सरावाचे होऊन जातील. जसे टेबल, फॅन, स्कूल हे शब्द आपल्याशी समरस झाले तसेच काही शब्द आपल्याला भेटतील. अशी परभाषेतील शब्दांची योजना जाणीवपूर्वक केली की काय असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

'बारकावा त्यास दिसला पुष्पमाला टाकतांना ड्रेस दिसतो तोच पण का वेगळा हा फेस आहे' ड्रेस, चांगल्याच ओळखीचा व परिचयाचा आहे. 'फेस' तोंडाला आलेला नसून तो चेहरा या अर्थाने वापरला आहे. सुज्ञ वाचकांच्या हे लगेच ध्यानात येते.

एखाद्या बाबीकडे आपण गांभीर्याने पाहतो तेव्हा अनेक कोडे चुटकीसरशी सुटत असतात. खरेच अशा शब्दांचा वापर, कवितेत आवश्यक असतो काय? व तसे ते आवश्यक का असू नयेत, अशी चर्चा मग ओघाने आलीच. इतरांपेक्षा काही वेगळे हा अट्टाहास नसून, रूढ होत चाललेली ती एक बाब आहे, इतकेच!

एखादा, उर्दू भाषेतील शब्द चपखल बसून कवितेला समृद्ध बनवत असेल शिवाय तो बहुतेक परिचयाचा असेल तर असे शब्द कवी हटकून वापरताना दिसतात. व त्यात काही गैर नाही. इंग्रजीतील अनेक शब्द आपल्या भाषेने स्वीकारल्यासारखे वाटतात. ते रचनेत निर्ढावल्यासारखे वावरताना इथे दिसतात. कवितासंग्रहातील विविधता लक्षात घेता ही बाब इथे नोंद घेण्यासारखी आहे.

'मी जन्म याचसाठी खर्चून टाकला की मीरेपरी दिवाण्या जगतील दोन ओळी' वरील दोन ओळीत प्रचंड आशय ओतप्रोत भरलेला दिसून येतो. विशेषतः 'खर्चून' अन् 'जगतील' हे दोन शब्द फार व्यापक अर्थाने योजन्यात आले आहेत. किंबहुना, हे दोन शब्द इथून गाळले तर, कल्पना करा. कवीची, ताकद नेमकी हीच असते. मुरलेल्या लोणच्याप्रमाणे ती दिसून पडते. यासाठी ना भरभर लिहावे लागते ना भाराभर! अशा कल्पना नेमक्या सुचतात कशा? असा प्रश्न उपस्थित होणे साहजिक आहे.

नुसते लिहायचे म्हणून कवी/ लेखक लिहीत नसतो. त्याला सामाजिक भान असावे लागते. तसे असले की मग त्याची लेखणी अधिक तळपते. अगदी, 'एक तुतारी द्या मज आणून' सारखी. मनुष्यस्वभावातील समज गैरसमज परिणामकारक शब्दबद्ध करायला तो कच खात नाही. आता हेच पहा ना,'तिन्ही मुली ह्या मुलासारख्या सांगत होती जर सर्वांना

वंशासाठी, का चौथ्यांदा तिने मुलाची वाट पाहिली?'

स्त्री मनाची घालमेल. जगरहाटीतील समजगैरसमाजावर मस्तपैकी कोरडा ओढून इथल्या सामाजिक परिस्थितीचे पितळ उघडे पाडत असताना, नेमका प्रश्न उपस्थित करुन समाजाप्रबोधन ही करण्यात आले आहे. वंशाच्या दिव्याला अजुनही महत्व आहे. मुलगी झाली की तोंडावर बारा वाजले म्हणून समजा. वरील दोन ओळीच्या शेराचे महत्व इथे अधोरेखीत करण्यास कवी शंभर टक्के यशस्वी होताना दिसतो.'या हृदयातुन त्या हृदयावर अक्षरलेणी कोरत असतो

मी रेघोट्या ओढत नाही माणुस- माणुस जोडत आसतो.' परस्पर संबंध जोडणे खूप सोपे असते; पण जोडलेले टिकविण्यासाठी कस लागत असतो. माणसे जोडणे व ती टिकवून ठेवणे मोठी कसरत आहे. या आघाडीवर कवी, प्रवीण बोपुलकर चांगले यशस्वी झाले आहेत. ह्या दोन ओळी हृदयापासून झिरपल्या आहेत. प्रत्यक्ष अनुभव आणि त्या अनुभवांची कसोटी इथे कागदावर उतरली आहे. केवळ, वही- पेन दर्जेदार असून भागत नाही, कल्पनाशक्तीची भरारी तेवढीच आवश्यक आहे, 'अवतरण चिन्ह' च्या पानांतील प्रत्येक ओळीत ती तशी दिसून पडते.

'इतकी लहान झाली व्याख्या कशी घराची बांधून चार भिंती म्हणती तया निवारा'चार भिंतीच्या आत एकत्र राहुनही जिव्हाळा संपुष्टात आला आहे. सद्याचे चित्र फार विदारक आहे. संयुक्त कुटुंबपद्धती लयास गेली आहे. नुसत्या चार भिंती बांधून झाल्या की झाले घर बांधून! हा खुळेपणा आहे. घराला घरपण आवश्यक आहे. त्याशिवाय मजा नाही.

जगरहाटीतल्या साध्या वाटणाऱ्या; पण अतिषय मौलिक असणाऱ्या बाबींचा 'अवतरण चिन्ह' मध्ये सटीक धांडोळा घेण्यात आला आहे. कवितेचे सामर्थ्य नेमके कसे असते किंबहुना कसे असायला पाहिजे हे इथे ढळढळीत दिसून पडते.'लाज वाटते काम कराया शेतामधले शिकल्यानंतर हीच तुझी तर अडचण आहे' शेतीमातीशी पक्की नाळ असलेला कवी, अशा प्रकारचे टोकाचे सत्य सांगून क्षणात मोकळा होतो. जेमतेम शिक्षण घेतल्यावर शेतीत राबायचा कंटाळा येतो. प्रत्यक्ष अनुभवातून अशा ओळी कागदावर उतरत असतात.

बापाचे हुंदके अन् आईची माया अनुभवयाची असेन तर 'अवतरण चिन्ह' सारखा कवितासंग्रह आपल्या संग्रही असणे आवश्यक होऊन जातो. कवी, प्रवीण बोपुलकर यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास,

'स्मरे बापाचे हुंदके
आई दृष्टी न्याहाळते
रोज चंदनासारखी
माहेराला उगाळते'

'माहेर' ह्या अष्टाक्षरी रचने मधल्या या सुंदर ओळी. सासुरवाशीणची तगमग या कवितेत अतिशय ताकदीने उभी करण्यात आली आहे. वाचताना डोळे तरळले तर फार आश्चर्य वाटणार नाही.

'साधा भोळा होतो मी तर शहरामध्ये येण्यापूर्वी याच्या त्याच्या कुरघोड्या मी कार्यालयात शिकलो'मनुष्यस्वभावाचे ज्वलंत चित्रण यापेक्षा वेगळे असूच शकत नाही. काही ठावूक नसते ती गोष्ट वेगळी. जरा काय शहाणपण आले की माणसाला फंख फुटून ते फडफडायला आतूर असतात.

वाढ होते आदराची आदराने
होत नाही फार तोटा वाकल्याने'

समाजात वावरत असता भान विसरुन चालत नाही. इतरांचा आदर केला की तुम्ही ही आदरास पात्र असता. सामंजस्याने व सौजन्याने वागण्याचा खूप फायदा होत असतो. स्वानुभावातून असे बोधामृत वितरित होत असते. कळतनकळत त्याचा फायदा होत असतो. 'अवतरण चिन्ह, हा एक अतिषय दर्जेदार कवितासंग्रह आहे. प्रत्येकाच्या तो संग्रही असावा असे वाटते.

'व्याख्या समर्पणाची ठरतील दोन ओळी
नसलो जरी उद्या मी .... असतील दोन ओळी,

खरेतर, संवेदनशील व्यक्तीच अशी माफक अपेक्षा व्यक्त करू शकतो. एरव्ही, अमरपट्टा घेऊन कोणीच आले नसले तरी कवीच्या ह्या दोन ओळी चर्र करत हृदयाच्या आरपार जातात. प्रसंगी आभाळाला गवसणी घालणारी माणसे जमिनीवर एवढे घट्ट पाय रोवून कसे उभे असतात? असा भाबडा प्रश्न अशावेळी उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही. लेखनात सातत्य असले अन् कमालीचा व्यासंग असला की, 'अवतरण चिन्ह' सारखा कवितासंग्रह निर्माण होऊन नावारुपाला येतो. वाचक, जाणकार व अभ्यासकांच्या नजरा आपल्याकडे वळविण्यात तो यशस्वी ठरतो. श्री. प्रवीण बोपुलकर यांच्या भावी लेखनास शुभेच्छा देऊन, आपली रजा घेतो

**- सुरेश नागले. नवी-मुंबई**

# लाडकी बहीण योजना की लाडका भ्रष्टाचार?

राज्य शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणलेली ‘लाडकी बहीण योजना’ ही सुरुवातीला स्त्रीशक्तीच्या उन्नतीचा एक उत्तम उपक्रम म्हणून जनतेसमोर सादर करण्यात आली होती. जनतेनेही विश्वास ठेवला की ही योजना गरीब, वंचित, श्रमिक महिलांच्या जीवनात उजेड घेऊन येईल. पण आज ज्या प्रकारे या योजनेत १२,४३१ पुरुष लाभार्थ्यांचे नावे निघाली, त्यातही शासकीय कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याचे उघड झाले आहे, त्याने संपूर्ण राज्य हादरले आहे. ही योजना महिलांसाठी, त्यांच्या स्वावलंबनासाठी होती. पण वास्तव काय? योजनेचा लाभ ज्यांना मिळायला हवा होता, त्या गरीब महिला अजूनही अर्जांच्या ओळींत उभ्या आहेत, तर काही ‘महाभाग’ पुरुषांनी’ आणि ‘खास साखरपेरणी केलेल्या अधिकाऱ्यांनी’ कोट्यवधींचा गंडा घालून घेतला आहे. शासन यंत्रणेचा कारभार पारदर्शकतेच्या विरुद्ध जात असल्याचा हा जिवंत पुरावा आहे.

राज्य प्रशासनात योजनांचा उद्देश चांगला असतो, पण अंमलबजावणीच्या पातळीवर ‘कमिशनखोरांची’ टोळी घुसली की योजना ‘लोकहिताची नव्हे तर लाभार्थ्यांची खेळी’ बनते. या प्रकरणातही अर्ज प्रक्रिया, पात्रता तपासणी आणि डेटा पडताळणी यामध्ये प्रचंड बेपर्वाई किंवा मुद्दाम केलेली ‘छेडछाड’ दिसून येते. डिजिटल शासनाच्या काळातही एखादा पुरुष ‘लाडकी बहीण’ बनतो, हे विनोद नसून व्यवस्थेच्या अपयशाचे आरसे आणि भ्रष्टाचाराची लाडकी परंपरा आहे !

कोट्यवधींची लूट, जनतेची फसवणूक



या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांची नावे असणे ही केवळ लाजीरवाणी गोष्ट नाही, तर ती जनतेच्या पैशावरचा थेट डाका आणि दुहेरी गुन्हा आहे. हेच कर्मचारी योजनांची पडताळणी करतात, कागदपत्रे तपासतात, आणि अखेरीस निधी मंजूर करतात. मग प्रश्न उभा राहतो की, “जनतेच्या पैशाचा रखवालदार कोण आणि लुटारू कोण?” हजारो अर्जांमधील गैरव्यवहार, कोट्यवधींचे अनधिकृत वितरण आणि बनावट लाभार्थ्यांच्या यादींमुळे ही योजना विश्वासार्हतेच्या खड्ड्यात कोसळली आहे. तरीही शासन केवळ “चौकशी सुरू आहे” या चार शब्दांत आपली जबाबदारी झटकते. पण चौकशी ही फक्त औपचारिकता नसावी. या लुटीमागील मुळ कारणांवर, यंत्रणेतील दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास, उद्या प्रत्येक योजना ही भ्रष्टाचाराचा कारखाना बनेल. “जनतेचे पैसे कुणाच्या खिशात गेले?” हा कोट्यवधींचा गंडा असूनही राज्य शासन गप्प का ?

ही योजना ‘लाडकी बहीण’ नावाची असली तरी तिच्या नावावर झालेला हा गैरव्यवहार म्हणजे महिलांच्या सन्मानावरचा घाव आणि त्यांचा घोर अपमान आहे. गरीब महिलांना फसवून त्यांच्या नावावर पुरुषांनी लाभ मिळवणे म्हणजे समाजातील असमानतेची नवी व्यथा आहे. शासनाने आता ‘लाडकी बहीण योजना नव्हे, लाडका भ्रष्टाचार रोखण्याची योजना’ राबवावी, अशी जनतेची मागणी आहे. फक्त शासनालाच दोष देणे पुरेसे नाही. जनतेनेही सजग राहिले पाहिजे. प्रत्येकाने आपला हक्काचा लाभ योग्य रीतीने मिळतोय का, यावर लक्ष ठेवले पाहिजे. लोकशाहीत शासनाला प्रश्न विचारणे, जबाबदारीची मागणी करणे हे जनतेचे उत्तरदायित्व आणि कर्तव्य आहे.

‘लाडकी बहीण योजना’ हा उपक्रम लोककल्याणाचा असायला हवा होता. पण तो आज ‘योजनांच्या नावावर चालणाऱ्या लुटीचा नवा अध्याय’ बनला आहे. जर शासनाने तातडीने कठोर कारवाई केली नाही, तर या योजनांचा हेतू, विश्वास आणि लोकशाहीवरील श्रद्धा दोन्ही ढासळतील. महिलांसाठी असलेली योजना पुरुषांच्या खिशात गेली, हा फक्त आकड्यांचा नव्हे तर अंतरात्म्याचा अपमान आहे.

**- प्रवीण बागडे**

# लाखनी येथे ग्रामीण युवा साहित्य संमेलनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

भंडारा -लाखनी येथील उत्सव सेलिब्रेशन हॉल अँड लान येथे येथे दिनांक 15 आणि 16 नोव्हेंबर 2025 रोजी दोन दिवसीय जिल्हास्तरीय पहिले ग्रामीण युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र शासन यांच्या अनुदानातून मुक्ताई बहुउद्देशीय शिक्षण संस्था दिघोरी /नान्होरी जि. भंडारा द्वारा आयोजित या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून प्रसिद्ध रंगकर्मी आणि समीक्षक प्रा. डॉ. संजयकुमार निंबेकर तर उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, नागपूर,विशेष अतिथी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी उमेश नंदागवळी, निर्माता, दिग्दर्शक जयू भाटकर, मुंबई , प्रसिद्ध साहित्यिक लखनसिंह कटरे, डॉ. प्रमोद मुनघाटे, वसंत वाहोकार, अतिथी म्हणून डॉ. सोमदत्त करंजेकर, डॉ. सोपानदेव पिसे,डॉ. श्रीकांत भोवते,खूमेंद्र बोपचे, कवी प्रमोदकुमार अणेराव, रोशन जांभुळकर, सभापती अश्विनी मोहतुरे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीषा निंबार्ते, डॉ. स्वाती वाघाये, नगराध्यक्षा त्रिवेणी पोहरकर , सरपंच शेषराव वंजारी,सचिन बागडे हे प्रमुख अतिथी म्हणून प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी काही लेखकांच्या पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. 'अभिजात मराठी भाषेत ग्रामीण साहित्याचे वेगळेपण ' या विषयावरील परिसंवादाचे अध्यक्ष डॉ.राजकुमार मुसने तर वक्ते म्हणून डॉ. के. एल. देशपांडे,डॉ.नीलिमा कापसे, डॉ. अरविंद कटरे, डॉ. धनराज खानोरकर,डॉ.जगजीवन कोटांगले हे उपस्थित राहणार आहेत. दु. 2-30 वा.अरुण बनसोड आणि त्यांचा संच 'खडीगंमत 'हा कार्यक्रम सादर करतील. 3-15 वा.झाडीप्रवर्तक तथा बोलीतज्ज्ञ डॉ.हरिश्चंद्र बोरकर यांची प्रकट मुलाखत होणार आहे.डॉ.मुक्ता आगाशे आणि कुंजीराम गोंधोळे ही मुलाखत घेतील.सायं.4-15 वा. अनिल शेंडे आणि पालिकचंद बिसेन यांच्या बासरी वादनाची जुगलबंदी रसिकांना ऐकता येईल. सायं. 5-00 वा.झाडीपट्टीतील युवा कलावंतांचा पंचरंगी लोककलाविष्कार 'झाडीपट्टीचा धुमधडाका ' हा कार्यक्रम सादर होणार आहे. रविवार दि. 16 नोव्हेंबर 2025 रोजी स. 10-00 वा. सुप्रसिद्ध गझलकार प्रल्हाद सोनवाने यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन होईल. प्रा.युवराज गंगाराम, गजेंद्र गजभिये,हरिभाऊ मोहतुरे, माणिक गेडाम,सुरेश वंजारी,बापू इलमकर हे प्रमुख अतिथी राहतील. यात निमंत्रित कवी आपल्या कविता सादर करतील. दु. 12-00 वा. 'मराठीतील विविध साहित्य प्रवाह' या विषयावरील परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. रेणुकादास उबाळे तर वक्ते म्हणून डॉ.बंडू चौधरी प्रा.प्रवीण कांबळे,प्रा. नरेश आंबिलकर,डॉ.जयश्री सातोकर हे उपस्थित राहणार आहेत. दुपारी 2-30 वा. महेंद्र गोंडाने यांचा' सहावी बाळंतीण' हा धमाल विनोदी एकपात्री प्रयोग होणार आहे. दुपारी 3-15 वा. 'नैराश्यमय युवा पिढीतील व्यसनाधीनता: एक प्रश्न,अनेक उत्तरे ' या विषयावरील परिसंवादाचे अध्यक्ष जयू भाटकर, सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ महाराष्ट्र शासन हे राहतील तर वक्ते म्हणून प्रा. दिनेश कोटांगले, डॉ. शरद मेश्राम, जितेंद्र असोले,निखिल बनसोड, अवंती सिंगनजुडे हे आपले विचार व्यक्त करतील. त्यानंतर 4-15 वा. भंडारा जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिकांचा सत्कार समारोह आणि समारोपीय कार्यक्रम होणार आहे,त्यात डॉ.संजयकुमार निंबेकर अध्यक्षस्थानी तर अतिथी म्हणून जयू भाटकर, डॉ. प्रमोद मुनघाटे,भगवान सुखदेवे,डॉ. धनंजय भिमटे, सुभाष बावनकुळे, जि. प. सदस्य विद्याताई कुंभरे,सुर्मीला पटले, गणेश निरगुडे, माजी सभापती अशोकभाऊ चोले,माजी जि. प. सदस्य आकाश कोरे,मुख्य न्यायरक्षक ऍड.भारत गभणे हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. तर डॉ. हेमकृष्ण कापगते, सी.एम. बागडे,हर्षल मेश्राम, अमृत बनसोड,डोमाजी कापगते या भंडारा जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिकांचा सत्कार होणार आहे. दोन दिवसीय साहित्य संमेलनातील उदघाटकीय आणि समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्य संयोजक तथा मुक्ताई बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. सुरेश खोब्रागडे, विना डोंगरवार, निमंत्रक डॉ. युवराज खोब्रागडे हे करतील. मुख्य संयोजक डॉ. सुरेश खोब्रागडे, निमंत्रक डॉ. युवराज खोब्रागडे, स्वागताध्यक्ष संजय वनवे, आयोजन समिती अध्यक्ष रामेश्वर बिसेन, सचिव डॉ.

रेवाराम खोब्रागडे , सुरेंद्र बन्सोड, नामदेव कानेकर, रंजित वासनिक, अश्विनी भिवगडे,गोपाल नाकाडे, आशाताई वनवे, सुमनताई कानेकर, वैशाली निंबेकर, बाबुराव निखाडे, भास्कर पिंपळे, प्रमोद लांडगे, रवी खोब्रागडे, रवी रामटेके, देवराम शेंडे, डॉ. युवराज मोटघरे, प्रा. उमेश सिंगनजुडे, आकाश भैसारे आदी कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## आम्ही पत्रकारिता क्षेत्रात जातीचा विषय मानत नाही...!; ना "जातीसाठी ना मातीसाठी" लढाई फक्त पत्रकारांच्या न्याय व हक्कासाठी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे**

दैनंदिन जीवनात जात कुठलीही असो, जात फक्त लग्नाच्या वेळी आणि मुलाबाळांच्या शिक्षणाच्या वेळीच कामी येते मग शहरातील इतर पत्रकार जातीचा विषय का पुढे आणतात...?

जातीला दाखवून पत्रकारिता पुढे आणू नका, आज यवतमाळ शहरासह संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जाती धर्माचा माणूस पत्रकारिता करत आहे मग तो पाटील असो कुणबी असो मुस्लिम असो मारवाडी असो का एससी असो यासह इतर समाजाचे युवा प्रतिनिधी पत्रकारिता करत आहे पत्रकार, ज्या समाजातील विद्यार्थ्यांनी आपले रीतसर शिक्षण पूर्ण केले आहे त्याला तुम्ही दाबणारे कोण, तसेच ज्या माणसाला लिहिता वाचता येते त्याची अंगी लिहिण्याची कला लोकांना वाजवण्याची कला आहे त्याला तुम्ही गाबणारे कोण?

मग यवतमाळ शहरात पत्रकारांना मारहाण केल्या जाते केव्हा पत्रकार एखाद्या भाईला डॉनला का फोन लावतो, आम्ही आजपर्यंत प्रामाणिक पत्रकाचा केली आहे. शेवटच्य वेळी माझ्या बापानं, "वडिलांनी" एकच शिकवलं तेही मराठी भाषेत कोणी जर तुमच्या ढुंगणाला ( गांडीला ) चिमटा घेतला तर त्याला सोडू नका मग तो गावातला कितीही मोठा पत्रकार किंवा भाई असो, आर्या पार. पृथ्वीवर जन्मलेला प्रत्येक माणूस किंवा पत्रकार त्याचे जीवन मरण अटळ आहे. मग लोकांच्या गुलामगिरी करण्यापेक्षा विविध क्षेत्रातील लोकांना न्याय देऊन मरण्यापेक्षा हे बरे नाही काय हीच खरी पत्रकारिता....!

आपली - पत्रकार संरक्षण समिती, महाराष्ट्र राज्य ( रजि. )

## परतीच्या पावसाचा कहर – सोयगाव परिसरात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत,शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी :विजय काळे**

**सोयगाव:-** शहरासह संपूर्ण तालुक्यात परतीच्या पावसाने शुक्रवारी दुपारी अक्षरशः धुमाकूळ घातला. दुपारी बारा वाजल्यापासूनच मुसळधार पावसाने हजेरी लावताच जनजीवन विस्कळीत झाले. अचानक आलेल्या पावसामुळे रस्ते ओलेचिंब झाले, तर वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिकांचे दैनंदिन व्यवहार विस्कळीत झाले.दुपारनंतर पावसासोबत जोरदार वारे वाहू लागल्याने परिसरातील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मका, सोयाबीन, कापूस, तूर तसेच भाजीपाला पिकांवर अवकाळी पावसाचा मोठा परिणाम झाला. अनेक शेतकऱ्यांनी नुकतेच कापणी केलेले मका व सोयाबीन शेतात साठवून ठेवले होते; मात्र



अचानक आलेल्या पावसामुळे या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.पावसाची सुरुवात होताच शेतकरी वर्गाने पिकांच्या गंजी झाकण्यासाठी धावपळ केली. परंतु वारा आणि मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी गंजी उघड्याच राहिल्याने धान्य भिजले आहे.

परिणामी मका व सोयाबीनची गुणवत्ता घसरून आर्थिक तोटा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, रब्बी हंगामासाठी अनेक शेतकऱ्यांनी गहू, हरभरा आणि भुईमूग पेरणीची तयारी सुरू केली होती. परंतु पावसामुळे शेतात पाणी साचल्याने मशागतीचे काम दोन ते चार दिवस पुढे ढकलावे लागेल. त्यामुळे रब्बी पेरणी उशिरा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शहरातील काही भागात पावसामुळे वीज पुरवठा खंडित झाला असून रस्त्यांवर पाणी साचले आहे. नागरिकांना प्रवास करताना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.या परतीच्या पावसामुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचे आर्थिक गणित अधिकच बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांनी शासनाने नुकसानीचे पंचनामे करून मदत द्यावी,अशी मागणी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष राजेंद्र काळे व ऍड.योगेश पाटील यांनी केली आहे.

माणूस मानूसकी विसरला
कमीत कमी वरूण राज्या तु आन्नदात्याशी तर माणूसकी ठेव....
आजच्या पावसामूळे कापूसओला
सोयाबीन ओली
मक्का ओली
.....थोड्या फार आशा जिंवत होत्या आज त्या पण संपवून टाकल्या वरून राज्याने
सणासुदी शेतकरांच्या डोळ्यातही पाणी आणी शेतात ही पाणी.... कृषी भूषण अरूण सोहणी

## पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिवाळी उत्सव काळात रात्रपाळीमध्ये विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण असून, नागरिकांच्या आरोग्यदायी व स्वच्छ वातावरणात सण साजरा व्हावा यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत 'विशेष स्वच्छता मोहीम' राबविण्यात आली. महानगरपालिका आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली उप आयुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या नेतृत्वाखाली दिवाळी उत्सव काळात संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये रात्रपाळीमध्ये विशेष रस्ते सफाई आणि घनकचरा संकलन मोहीमहाती घेण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत नाइट शिफ्टमध्ये एकूण 104 सफाई कर्मचारी नियुक्त करून दररोज 41.8 किलोमीटर लांबीच्या प्रमुख रस्त्यांची सखोल सफाई करण्यात आली. या कर्मचाऱ्यांनी रात्रीच्या वेळी दिवसभर सणानिमित्त झालेल्या कचऱ्याचे त्वरित संकलन करून रस्ते स्वच्छ ठेवण्याचे मोलाचे कार्य केले.

सणाच्या काळात शहरात मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे त्वरित व्यवस्थापन करण्यासाठी या विशेष मोहिमेत *9 घंटागाड्या, 7 टिपर, 1 JCB आणि 1 हायड्राया वाहनांचा वापर करण्यात आला. या सर्व वाहनांद्वारे दररोज सुमारे 140 टन कचऱ्याचे संकलन आणि विल्हेवाट लावण्यात आली. दिवाळीच्या काळात विशेषतः फटाके, सजावट साहित्य, फुलांची पाने, पूजनसाहित्य, पॅकिंग मटेरियल यांसारखा मोठ्या प्रमाणात निर्माण होणारा कचरा तातडीने गोळा करून शहरातील स्वच्छता अबाधित राखण्यात आली.

महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने सण काळात नागरिकांकडून निर्माण होणारा कचरा वर्गीकृत स्वरूपात देण्याचे आवाहन केले होते. नागरिकांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद देत ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे देण्याचे भान



राखल्यामुळे या मोहिमेला अधिक यश मिळाले.

स्वच्छ पनवेल, प्रगतिशील पनवेल या ध्येयाने कार्यरत असलेल्या महानगरपालिकेने या विशेष मोहिमेद्वारे दिवाळी सण काळात स्वच्छतेचा आदर्श निर्माण केला. शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा, सार्वजनिक ठिकाणे, वसाहती परिसर याठिकाणी रात्रपाळीमध्ये सातत्याने स्वच्छतेची कामे करण्यात आली.

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त श्री.मंगेश चितळे यांनी या मोहिमेत सहभागी विभागप्रमुख अनिल कोकरे, आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, जितेंद्र मढवी तसेच सर्व सफाई कर्मचारी, चालक, स्वच्छता निरीक्षक तसेच नागरिकांचे आभार मानले आहेत. दिवाळीच्या सणातही आपले दैनंदिन काम प्रामाणिकपणे पार पाडणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

उप आयुक्त डॉ. वैभव विधाते यांनी पुढेही अशाच प्रकारे विशेष मोहिमा राबवून शहराच्या स्वच्छतेत सातत्य ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## मुख्यमंत्रीं साहेब! उर्दू शाळांचा ‘माझी शाळा, सुंदर शाळा’ मोहिमेत समावेश करा - शेख अब्दुल रहीम



**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर**

राज्यातील उर्दू माध्यमाच्या शाळांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी “मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा” या अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात उर्दू शाळांचा समावेश करावा, अशी मागणी हॅप्पी टू हेल्प फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, 3 नोव्हेंबर ते 31 डिसेंबर 2025 या कालावधीत “मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा – टप्पा 3” राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत प्रत्येक जिल्ह्यात किमान एक उर्दू जिल्हा परिषद शाळा, एक उर्दू खाजगी शाळा आणि एक मनपा अथवा नगरपरिषद उर्दू शाळा निवडण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.शेख अब्दुल रहीम यांनी नमूद केले की, राज्यातील अनेक उर्दू शाळा उत्कृष्ट कामगिरी करत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहेत. त्यामुळे या शाळांना या मोहिमेत सहभागी होण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यांनी या मागणीवर मुख्यमंत्री यांनी स्वतः लक्ष घालावे, अशी मागणी केली आहे...

## भारत रशियाकडून तेल खरेदी थांबविणार; ट्रम्प यांचा पुन्हा नव्याने दावा

**दैनिक युवक आधार नवी दिल्ली :** रशियाकडून तेलाची खरेदी करण्यासंदर्भात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सातत्याने भारताबद्दल नवनवे दावे करीत असतानाच आता ट्रम्प यांनी, भारत या वर्षअखेरपर्यंत रशियाकडून तेलाची खरेदी करणे जवळपास थांबवेल, असा नव्याने दावा केला आहे.

भारत रशियाकडून तेल खरेदी कमी करणार असल्याचा दावा ट्रम्प यांनी नुकताच केला होता. आता त्यांनी पुन्हा एकदा या दाव्याचा पुनरुच्चार करत एका ठराविक प्रक्रियेनुसार भारत रशियाकडून तेल खरेदी कमी करणार असल्याचा दावा केला आहे. तेल खरेदी कमी करण्याचा निर्णय झाल्यावर लगेच त्याप्रमाणे कार्यवाही करता येत नाही. ही एक प्रक्रिया आहे आणि त्यानुसारच भारत रशियाकडून तेल खरेदी कमी करणार असल्याचे ते म्हणाले.

**४० टक्के कमी**

भारत आता रशियाकडून तेल खरेदी कमी करण्यासाठी पावले उचलत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींशी झालेल्या संभाषणाचा संदर्भ देत ट्रम्प म्हणाले की, भारत या वर्षाच्या अखेरीस रशियाकडून सुमारे ४० टक्के कमी तेल खरेदी करेल. त्यांनी हिंदुस्थानच्या या निर्णयाचे कौतुकही केले. या निर्णयामुळे रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी रशियावर दबाव येणार असल्याचे ते म्हणाले.यावेळी त्यांनी चीनसोबतचे संबंध सुधारण्यावरही भर दिला. ते म्हणाले, चीन आणि रशियामधील मैत्री कधीपर्यंत टिकेल, हे सांगता येत नाही. ट्रम्प यांचे विधान थेट जागतिक तेल बाजाराशी आणि रशिया-युक्रेन युद्धाच्या राजकारणाशी जोडलेले आहे. ते म्हणाले की, रशिया आणि चीनमधील मैत्री, जी सध्या मजबूत दिसते ती खरी नाही. ही मैत्री अमेरिकेचे माजी अध्यक्ष ओबामा आणि माजी अध्यक्ष बायडेन यांच्या धोरणांमुळे होती. रशिया आणि चीनमधील संबंध जबरदस्तीचे आहेत. मात्र, चीनशी शांतता आणि सकारात्मक सहकार्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



**जिनपिंग यांची भेट घेणार**

रशिया आणि चीनमधील संबंध आणखी मजबूत झाले तर ते जगातील धोरणात्मक संतुलन बदलू शकते. ट्रम्प हे जिनपिंग यांच्याशी थेट या विषयावर चर्चा करू इच्छितात आणि युद्ध संपवण्यासाठी तेल आणि ऊर्जेशी संबंधित उपाय शोधू इच्छितात. त्यांना विश्वास आहे की, जिनपिंग यावर उघडपणे चर्चा करू शकतात. डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषणा केली की ते पुढील आठवड्यात मलेशिया, दक्षिण कोरिया आणि जपान या तीन देशांचा दौरा करत आहेत. दक्षिण कोरियाच्या त्यांच्या भेटीदरम्यान ते चीनचे अध्यक्ष जिनपिंग यांची भेट घेणार आहेत. त्यात अनेक मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.

**भारताची सावध पावले**

भारताने रशियाकडून तेल खरेदी पूर्णपणे थांबवली नाही, तर हळूहळू कमी केली आहे. जुलै ते सप्टेंबर या कालावधीत रशियाकडून तेल आयातीत थोडीशी घट झाली होती. मात्र, ऑक्टोबरमध्ये रिलायन्स इंडस्ट्रीज आणि नयारा एनर्जी यासारख्या खासगी कंपन्यांनी पुन्हा खरेदी वाढवली. दरम्यान, सरकारी मालकीच्या रिफायनर्सनी खरेदी थोडी कमी केली. यावरून असे दिसून येते की, भारत सावधगिरीने पुढे जात आहे. ते स्वस्त तेल मिळवत आहेत आणि जागतिक दबाव व्यवस्थापित करत आहेत. तेल हे केवळ ऊर्जा नाही, तर भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. म्हणून, भारत आपल्या हितसंबंधांशी तडजोड करण्याच्या मनःस्थितीत नाही.

# अनोख्या संघर्षाची अनुभूती, सकाळ तर होऊ द्या...

अतिशय वेगळ्या जॉनरच्या या चित्रपटात सुबोध भावे आणि मानसी नाईक आजवर कधीही न दिसलेल्या रूपात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. लवकरच ‘सकाळ तर होऊ द्या’ची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. वास्तव परिस्थितीला सामोरे जात, तसेच असंख्य अडचणींवर मात करत जगण्याला नवी दिशा देणारी कथा या चित्रपटात प्रेक्षकांना पाहायला मिळेल. या चित्रपटाला हिंदीतील दिग्गज कलाकारांची साथ लाभली असून श्रेय पिक्चर कंपनीच्या बॅनरखाली तयार झालेल्या ‘सकाळ तर होऊ द्या’ या चित्रपटाची निर्मिती नम्रता सिन्हा यांनी केली आहे. नम्रता सिन्हा यांनी आजवर अनेक लोकप्रिय टीव्ही मालिका आणि वेबसीरिजची निर्मिती केली आहे. ज्यांनी ‘अंदाज अपना अपना’ आणि ‘नसीब’ यांसारख्या अनेक अजरामर हिंदी चित्रपटांची निर्मिती केली आहे. आता नम्रता सिन्हा यांनी ‘सकाळ तर होऊ द्या’ या चित्रपटाद्वारे मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केले आहे. आजवर हिंदीत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या आलोक जैन यांनी ‘सकाळ तर होऊ द्या’चे लेखन व दिग्दर्शन केले आहे.

सकाळ तर होऊ द्या हा मराठी चित्रपट प्रेक्षकांना जीवनातील एक अनोख्या संघर्षाची अनुभूती देतो. हा चित्रपट फक्त मनोरंजनापुरता मर्यादित नसून, मानवी मनाच्या गुंतागुंती, एकाकीपणा, आशा आणि निराशा यांची सजीव मांडणी करतो. चित्रपटाची सुरुवात एका साध्या रात्रीत होते, जेव्हा अभय पुरंदरे, जो एक श्रीमंत परंतु एकाकी व्यक्ती आहे, तो आपल्या जीवनाच्या अधोगतीत असतो. त्याच्या मनात अनेक विचार फिरत असतात, आणि तो कधीही आपल्या आयुष्यातील सर्वकाही सोडण्याच्या विचारात असतो. अशा परिस्थितीत नियती, एक देहविक्रेती, अचानक त्याच्या जीवनात प्रवेश करते. नियतीच्या आगमनाने अभयच्या आयुष्यातील शून्य आणि एकाकीपणाच्या छायेला थोडासा उजाळा मिळतो. नियती ही केवळ एका व्यक्तीच्या जीवनात प्रवेश करणारी पात्र नाही, तर तिचा अस्तित्व आणि तिच्या अनुभवांनी त्याच्या जीवनात अनेक प्रश्न उभे करतात, ज्यामुळे दोघांच्या जीवनात उलथापालथ होते. ही भेट एका साध्या संभाषणातून विकसित होते आणि प्रत्येक संवादातून प्रेक्षकांना जीवनाच्या गंभीर सत्याशी सामना करावा लागतो.

अभय आणि नियती यांच्यातील संवाद हा केवळ मानसिक संघर्षाचा दाखला देत नाही, तर भावनिक गुंतागुंत, आत्म-संशय, भय आणि आशेचा मिश्रणही प्रकट करतो. प्रेक्षक या पात्रांमध्ये स्वतःला पाहतात, कारण त्यांच्या अनुभवांमधून आयुष्यातील खरी एकाकीपणा, निर्णय घेण्याचे ताण आणि जीवनाचे अर्थ शोधण्याची प्रक्रिया स्पष्ट होते. अभयचा संघर्ष एक सामान्य व्यक्तीच्या मानसिकतेशी जुळवून सांगितला जातो. त्याच्या भावनांमध्ये एक विशिष्ट गती आहे, जी प्रेक्षकांना त्याच्या जीवनात खोलवर नेते. नियतीच्या भूमिकेत मानसी नाईकची उपस्थिती अत्यंत प्रभावी आहे. तिच्या नजरेतून, तिच्या शब्दांतून आणि तिच्या हालचालींमधून प्रेक्षकाला तिच्या जीवनातील अंधार आणि आशेचा समन्वय जाणवतो. तिचा अभिनय हा अभयच्या भूमिकेशी सुसंगत असून संपूर्ण चित्रपटाचा भावनिक ठोकाव वाढवतो. या दोन कलाकारांनी मिळून चित्रपटाच्या केंद्रस्थानी असलेल्या मानसिक संघर्षाची अनुभूती अत्यंत नैसर्गिक पद्धतीने प्रेक्षकांपर्यंत पोहोचवली आहे. त्यांच्या अभिनयातून प्रेक्षकांना पात्रांच्या मनोवृत्तीचा, त्यांच्या अंतर्गत ताणाचा आणि आयुष्यातील गडबडीचा सजीव अनुभव मिळतो.

चित्रपटाचे दिग्दर्शन अतिशय सूक्ष्म आणि प्रभावी आहे. आलोक जैन यांनी कथानकाला एक निरंतर प्रवाह दिला आहे, जिथे गती हळूहळू वाढते आणि प्रेक्षकांना कथेशी बांधून ठेवते. सुरुवातीला कथानक संथ वाटत असले तरी, मध्यंतरानंतर कथानक उत्कंठावर्धक बनते आणि दोन्ही पात्रांच्या मनोविकारांची उकल होत राहते. दिग्दर्शनाचे यश हे फक्त कथानकावर आधारित नसून, दृश्य रचना, कॅमेरा अँगल्स, प्रकाशयोजना आणि स्थानिक वातावरणाच्या नैसर्गिकतेवरही अवलंबून आहे. छायांकनाच्या माध्यमातून गावातील वातावरण, रात्रीची शांतता आणि पात्रांच्या भावनिक स्थितीचे सूक्ष्म दर्शन प्रेक्षकांसमोर येते. तसेच, रंगसंगतीचा योग्य वापर करून चित्रपटाला एक सजीव आणि वास्तववादी रूप दिले आहे. संगीत आणि पार्श्वसंगीत हे कथानकाच्या प्रवाहाला पाठबळ देतात. पार्श्वसंगीत केवळ वातावरण रचण्यासाठी नसून, प्रत्येक दृश्यातील भावनांना अधोरेखित करते. संगीताचा वापर हा दृश्याचा भार वाढवतो, पण कधीही कथानकावर ओझे होत नाही.

कथेतील संवाद अत्यंत नैसर्गिक आहेत. हे संवाद केवळ पात्रांची माहिती देण्यासाठी नसून, प्रेक्षकांच्या मनाला भावनिक आणि बौद्धिकपणे गुंतवतात. प्रत्येक वाक्याचा अर्थ खोल आहे, प्रत्येक संभाषणाचा परिणाम पात्रांच्या मानसिकतेवर दिसून येतो. सकाळ तर होऊ द्या या शीर्षकाचा अर्थही या संवादांद्वारे स्पष्ट होतो. सकाळ आणि तार यांचा संगम हा बदल, नवीन सुरुवात आणि जीवनातील आशेचा प्रतीक आहे. या शीर्षकामध्ये संपूर्ण कथानकाचे तात्पर्य दडलेले आहे, जिथे जीवनात नवीन सुरुवात करण्याची संधी आणि मनाच्या अंधकारातून बाहेर पडण्याची प्रेरणा दिसते.

चित्रपटातील सामाजिक संदर्भ अत्यंत महत्त्वाचा आहे. हा चित्रपट फक्त दोन व्यक्तींच्या संघर्षापुरता मर्यादित नसून, आधुनिक जीवनातील मानसिक ताण, एकाकीपणा, समाजातील अपेक्षा आणि मूल्यांच्या बदलांवरही प्रकाश टाकतो. ग्रामीण आणि शहरी जीवनातील फरक, जीवनशैलीतील बदल, आधुनिकतेच्या छायेत ग्रामीण जीवन कसे बदलते, याची जाण प्रेक्षकांना होते. चित्रपटातील पात्रे समाजातील विशिष्ट भूमिका दर्शवतात, परंतु त्यांचे अनुभव सार्वत्रिक आहेत. प्रेक्षक त्यांच्या अनुभवांशी स्वतःला जोडतात आणि जीवनातील वास्तविकतेशी संघर्ष अनुभवतात.

तांत्रिकदृष्ट्या हा चित्रपट उत्कृष्ट आहे. छायांकन, रंगसंगती, साऊंड डिझाईन, संपादन आणि दृश्य रचना या सर्वांचा योग्य समन्वय करून कथानकाला अत्यंत सुसंगत रूप दिले आहे. संपादनामुळे कथा सुरळीतपणे पुढे जाते, कुठेही संथगती जाणवत नाही. साऊंड डिझाईन आणि ऑडिओ गुणवत्ता प्रेक्षकांना कथेशी जोडून ठेवते. या सर्व तांत्रिक बाजूंच्या उत्कृष्टतेमुळे चित्रपटाचा अनुभव अधिक वास्तविक आणि परिणामकारक होतो. चित्रपटाची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची नैसर्गिकता आणि पात्रांच्या मनोविकारांचे वास्तववादी चित्रण. केवळ दोन मुख्य पात्रांच्या भोवती कथानक फिरत असल्याने, दिग्दर्शन आणि अभिनयाचे वजन अधिक आहे, आणि ही जबाबदारी चित्रपटाने यशस्वीपणे पार पाडली आहे. प्रेक्षक या चित्रपटातून जीवनाच्या खोल अर्थाचा अनुभव घेतात. पात्रांच्या संघर्षाद्वारे स्वतःच्या आयुष्याचा परावर्त मिळवतात आणि जीवनातील आशा, निराशा आणि बदल या सर्व घटकांना समजून घेतात.

सकाळ तर होऊ द्या हा चित्रपट मराठी सिनेमाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा प्रयोग आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना विचार करण्यास प्रवृत्त करतो, मानसिक संघर्षाचे दृश्य उलगडतो, आणि जीवनाच्या गडबडीवर प्रकाश टाकतो. अभय आणि नियती या पात्रांच्या माध्यमातून जीवनातील एकाकीपणा, मानसिक ताण, निर्णय घेण्याची प्रक्रिया आणि आशेचा संघर्ष अत्यंत प्रभावीपणे दाखवला आहे. या चित्रपटामुळे प्रेक्षकांचा अनुभव केवळ दृश्यात्मक नसून, भावनिक आणि बौद्धिकदृष्ट्याही समृद्ध होतो. एकूणच, जर तुम्हाला मानसिक संघर्ष,




जीवनातील गडबडी आणि भावनिक गतीवर आधारित चित्रपट आवडत असतील, तर सकाळ तर होऊ द्या हा चित्रपट नक्की पाहण्यासारखा आहे. हा चित्रपट केवळ मनोरंजन देत नाही, तर जीवनातील बदल, आशा, निराशा आणि मनुष्याच्या मानसिकतेची सजीव मांडणीदेखील करतो. सुबोध भावे आणि मानसी नाईक यांचा अभिनय, आलोक जैन यांचे दिग्दर्शन, संगीत, छायांकन आणि संवाद यांचा योग्य समन्वय चित्रपटाला एक वेगळाच अनुभव देतो. हा चित्रपट प्रेक्षकांना त्यांच्या आयुष्यातील भावनिक आणि बौद्धिक अनुभवांना नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी देतो. सकाळ तर होऊ द्या हा चित्रपट मराठी सिनेमाप्रेमींना नक्कीच भावेल आणि त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव टाकेल.चित्रपटाचे शीर्षक जरी साधे असले तरी, तो एक धाडसी आणि वेगळा प्रयोग आहे. जमल्यास हा चित्रपट आवर्जून सिनेमागृहात जाऊन बघावा.

## २ तास ४६ मिनिटांचा थ्रिलर चित्रपट, डोकं चक्रावणारा क्लायमॅक्स

अनेकांना नवीन रिलीज झालेले चित्रपट पाहायला आवडतात. आता तर ओटीटी प्लॅटफॉर्म्स असल्याने बॉलीवूड, दाक्षिणात्य, तसेच जगभरातील चित्रपट घरबसल्या पाहता येतात. काही चित्रपट इतके दमदार असतात की ते थिएटरमध्ये दमदार कमाई केल्यावर ओटीटीवरही ट्रेंड करतात. काही चित्रपट तुम्हाला शेवटपर्यंत खिळवून ठेवतात.

खरं तर कोणत्याही चित्रपटाची ताकद त्यातील कलाकार, कथा, पटकथा, ॲक्शन आणि गाण्यांवरून ठरते. आजकाल लोक थिएटरपेक्षा ओटीटी प्लॅटफॉर्मकडे जास्त वळले आहेत, कारण तिथे तुम्ही कुठेही आणि कधीही चित्रपट पाहू शकता. जर तुम्हाला सस्पेन्स चित्रपट आवडत असतील, तर हा दाक्षिणात्य चित्रपट नक्की पाहा.

इतकंच नाही तर या चित्रपट सस्पेन्स आणि थ्रिलचा एक जबरदस्त डोस मिळतो. त्यामुळे तुम्ही दिवाळीच्या सुट्टीत तो नक्की पाहू शकता. या चित्रपटाचे नाव काय, तो ओटीटी प्लॅटफॉर्मवर कुठे पाहता येईल, त्याचे आयएमडीबी रेटिंग, त्यातील कलाकार या सर्व गोष्टी जाणून घेऊयात.

**या चित्रपटाचे नाव काय?**

या चित्रपटाचे नाव आहे ‘थुडारम’. यात साऊथ सुपरस्टार मोहनलाल, प्रकाश



वर्मा आणि थॉमस यांच्यासह इतर कलाकार आहेत. या चित्रपट इतका सस्पेन्स डोस आहे की तुम्ही शेवटपर्यंत तो पाहाल. तसेच त्याची कथा भावनिक आहे. त्यामुळे तुम्हाला सस्पेन्स व इमोशन्स दोन्हीही गोष्टींचा मिलाफ यात पाहायला मिळेल.

**‘थुडारम’ची कथा काय आहे?**

‘थुडारम’ चित्रपटाची कथा एक ड्रायव्हर व त्याच्या कारवरील प्रेमापासून सुरू होते. या चित्रपटात मोहनलाल मुख्य भूमिकेत आहेत. ड्रायव्हरचं कारवर खूप प्रेम असतं. मग यात वेगळं काय, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. तर यातील सर्वात मोठा ट्विस्ट म्हणजे ही कार चोरीला जाते. त्यानंतर जणू त्याचं आयुष्यच बदलतं. जसजशी चित्रपटाची कथा पुढे सरकते, तसतशा भूतकाळातील काही गोष्टी समोर येऊ लागतात. चित्रपटातील सस्पेन्स तर उत्तम आहेच, पण त्यातील व्हिज्युअल सिनेमॅटोग्राफी, बॅकग्राउंड म्युझिकही खिळवून ठेवणारं आहे.

## टेलिव्हिजन ते ओटीटी, सुंदरा फेम अक्षया नाईकची बॉलिवूडमध्ये एंट्री

‘सुंदरा मनामध्ये भरली’ या मालिकेतून घरघरात पोहचलेली अभिनेत्री म्हणजे अक्षया नाईक. उत्तम अभिनय, सोबतीला अनेक दर्जेदार फोटो शूट आणि तिच्या सोशल मीडिया पोस्टमधून अक्षया कायम चर्चेत असलेली बघायला मिळते. नुकतंच अक्षयाचं दमदार ओटीटी पदार्पण झालं असून टेलिव्हिजन पासून सुरू झालेला तिचा प्रवास नेटफ्लिक्स डेब्यूपर्यंत येऊन पोहचला आहे.

नेटफ्लिक्स या लोकप्रिय ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झालेला ‘ग्रेटर कलेश’ या सिनेमातून अक्षयाने ओटीटीवर पदार्पण केले आहे. या चित्रपटात तिने एक खास भूमिका केली असून ती खूप लक्षवेधी ठरतेय. प्रत्येक कुटुंबात घडणाऱ्या फॅमिली ड्रामाच उत्तम उदाहरण असलेल्या या खास चित्रपटात तिने दमदार काम केलं आहे. अक्षया ने या चित्रपटात ‘पंखुरी’ हे पात्र साकारले असून ग्रेटर कलेश हा सिनेमा जगभरात नेटफ्लिक्सवर नंबर १



वर ट्रेंड होताना दिसतोय. कोणत्याही कलाकाराची बॉलिवूडमध्ये एकदा तरी काम करण्याची इच्छा असतेच आणि या निमित्ताने अक्षया या खास प्रोजेक्टचा भाग झाली आणि तिची बॉलिवूडमध्ये एंट्री झाली.

पहिल्या वहिल्या ओटीटी डेब्यूबद्दल बोलताना अक्षया सांगते, ‘माझी नेहमीच एक पाऊल पुढे टाकायची इच्छा असते आणि माझ्यासाठी कुठलंच काम छोटं नसतं. पण नेहमी नवीन काहीतरी करण्याची इच्छा असल्याने हा प्रोजेक्ट करण्याची मला संधी आली असं मला वाटतं. कुठल्याही कलाकारासाठी नेटफ्लिक्स हा प्लेटफॉर्म खूप मोठा आहे. माझा पहिला बॉलिवूड फिल्म डेब्यू इकडे होईल याची कल्पना नव्हती. एवढ्या मोठ्या ओटीटी प्लॅटफॉर्म चित्रपट करायला मिळणं ही संधी खूप खास होती, याचा तर आनंद आहे आणि अर्थातच आमची फिल्म सध्या नंबर १ वर ट्रेंड करत असल्यामुळे स्वतःलाच एक मस्त दिवाळी गिफ्ट मिळालं याचा आनंद वाटतोय’.

‘मी (Terribly Tiny Tales ) यांचा डिजिटल कंटेंट गेले अनेक वर्ष फॉलो करतेय आणि नेहमी त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा होती. या फिल्मच्या निमित्ताने ते देखील पूर्ण झाले. TTT आणि Netflix या दोन्ही गोष्टी मी मैनिफेस्ट (manifest) केल्या होत्या. त्या एकत्र आल्या आहेत. मी एकमेव अभिनेत्री होती जी त्यांच्यात नवीन होती. सगळे सहकलाकार एकमेकांना आधीपासून ओळखत होते. त्यांनी बरेच प्रोजेक्ट्स एकत्र केले होते. पण कुठल्याच क्षणी मला मी बाहेरची आउटसाइडर अभिनेत्री आहे, याची जाणीव करुन दिली नाही. माझी भूमिका जरी छोटी असली तरी ती खूप महत्वपूर्ण आहे. याचं संपूर्ण श्रेय मी आमचे दिग्दर्शक आदित्य चांदीओक आणि लेखक रितू मागो यांना देईन. एका टिपिकल मराठी मुलीकडून त्यांनी एक टिपिकल दिल्ली गर्ल साकारून घेतली आहे. एहसास चन्नाच्या सोबत सगळेच इतर कलाकार खूप सुंदर काम करतात आणि मुळात माणूस म्हणून देखील सगळे छान होते. चांगल्या प्रोजेक्टमध्ये काम करताना जेव्हा चांगली माणसं भेटतात तेव्हा त्या प्रोजेक्टच्या यशाचा आनंद हा शब्दात मांडता येत नाही’.

अभिनयाची चुणूक दाखवून आज अक्षयाचा बॉलिवूड सिनेइंडस्ट्रीमधला प्रवास जोरदार सुरू झाला आहे. येणाऱ्या काळात बॉलिवूडसोबत ती काही मराठी प्रोजेक्ट्समध्येही दिसणार आहे.

## गोड आणि तेलकट खाऊन शरीर जड झालंय? असं करा शरीर डिटॉक्स

दिवाळीत फराळ, मिठाई खाण्यात येते. घराघरांत फराळाचा सुगंध पसरतो. काही वेळा तर सणानिमित्ताने एकत्र आलेले नातेवाईक घरी आल्याने फराळासोबत जंकफूड असे अस्वाथ्यकर पदार्थ खाल्ले जातात. पण, अशा पदार्थामुळे शरीराचे स्वास्थ बिघडते.

जास्त तळेलेले पदार्थ आणि मिठाई खाल्यामुळे शरीरात एक प्रकारचा आळस येतो आणि थकवा जाणवतो. अशा वेळी शरीराला थोडंसं डिटॉक्स करण्याची गरज असते. शरीर डिटॉक्स केल्याने शरीरातील जडपणा कमी होतो. चला तर मग जाणून घेऊयात दिवाळीनंतरचं बॉडी डिटॉक्स

**लिंबू सरबत –**

दिवाळीनंतर बॉडी डिटॉक्स करण्यासाठी कोमट पाण्यात लिंबाचा रस आणि मध टाकून प्यावे. हे पेय




शरीरात विषारी घटक बाहेर काढते आणि पचनसंस्था सुरळीत करते.

**साखर खाऊ नका –**

मिठाई साखरेशिवाय अपूर्ण असते. दिवाळीत तर खूप जास्त प्रमाणात मिठाई खाल्ली जाते. अशावेळी बॉडी डिटॉक्स करण्यासाठी दिवाळीनंतर दोन ते तीन आठवडे साखरेचे पदार्थ खाणे बंद करावेत.

**पाणी प्यावे –**

बॉडी डिटॉक्ससाठी भरपूर पाणी प्यावे. यामुळे लघवीद्वारे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर निघतील.

**फायबरयुक्त डाएट –**

बॉडी डिटॉक्स करण्यासाठी फायबर शरीरात जाणे आवश्यक आहे. यासाठी फायबरयुक्त पदार्थ, काकडी, गाजर, हिरव्या पालेभाज्या आणि फळे खावीत.

**शरीर ॲक्टीव्ह ठेवा –**

शरीरातील जडपणा घालवण्यासाठी शरीर ॲक्टीव्ह ठेवावे. हलका-फुलका व्यायाय, योगा, स्ट्रेचिंग करू शकता. यामुळे रक्ताभिसरण वाढेल आणि शरीरातील आळसपणा कमी होईल.

**पूर्ण झोप घ्यावी –**

सणामध्ये धावपळ आणि दगदग होते. परिणामी झोप पूर्ण होत नाही आणि संपूर्ण शरीराचे स्वास्थ बिघडते. त्यामुळे दिवाळीनंतर शरीराचे चक्र पूर्ववत होण्यासाठी पूर्ण झोप घ्यावी.




**मेष** – एखादी दिलासादायक घटना घडेल. विक्षिप्त लोकांपासून दूर राहा. वेळेबरोबर चालावे लागेल. प्रगतीला चांगला वाव मिळेल.

**वृषभ** – प्रगतीच्या दृष्टीने पाऊल पुढे टाकाल. शक्यतो वादाच्या मुद्यात अडकू नका. वेळेचा सदुपयोग करावा. तब्येत उत्तम राहील.

**मिथुन** – महत्त्वाचे काम करता येईल. अनावश्यक खरेदी केली जाईल. कला-क्रीडा क्षेत्रात प्रगती होईल. धंदा मिळेल. मन स्थिर ठेवा.

**कर्क** – स्वप्नाळू वृत्तीतून बाहेर या. भाग्याची साथ लाभेल. आर्थिक घडी सुधारेल. कौतुकाची अपेक्षा ठेवू नका. जिद्द उपयोगी पडेल.

**सिंह** – तुमची महत्त्वाकांक्षा वाढेल. धंद्यात फायदा होईल. कठीण काम करून घ्या. वाद घालू नका. अधिकाऱ्यांचा पाठिंबा मिळवाल.

**कन्या** – तुमचे मत व्यक्त करण्याची घाई करू नका. धार्मिक कामात सहभागी होण्याची संधी मिळेल. आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल.

**तूळ** – आप्तेष्टांची भेट होईल. समोरील व्यक्तीवर चटकन विश्वास ठेवू नका. व्यावसायिक स्तरावर एखादी सकारात्मक घटना घडेल.


**वृश्चिक** – जोडीदाराचा प्रेमळ सहवास लाभेल. मित्रांसोबत वेळ घालवाल. गरज नसेल तर फार बोलू नका. प्रतिष्ठा सांभाळता येईल.

**धनु** – महत्त्वाचे काम करून घ्या. वरिष्ठ तुमचे मत विचारात घेतील. मानसिक दुर्बलता टाळावी. हितशत्रूंवर लक्ष ठेवावे. धंद्यात जम बसेल.

**मकर** – कोणत्याही गोष्टीची अतिशयोक्ती करू नका. आपली आध्यात्मिक आवड वाढीस लागेल. समोरील संधीचा लाभ घ्यावा.

**कुंभ** – मनासारखी घटना घडेल. तुमच्या बोलण्याचा प्रभाव पडेल. धरसोड वृत्ती ठेवू नका. नवे परिचय होतील. महत्त्वाचे काम करा.

**मीन** – पदाधिकार मिळाल्याने उत्साहित व्हाल. जोडीदाराशी मतभेद टाळा. सामाजिक कामात रमाल. विचारपूर्वक गुंतवणूक करावी.



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी साप्ताहिक रायगड मनोगतचे श्री स्वामी समर्थ दीपावली विशेष अंकाला शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यकारी संपादक संजय कदम

(दैनिक युवक आधार )

# बायकोचा खून केल्यानंतर पोलिसात नोंदवली हरवल्याची तक्रार

## विवाहबाह्य संबंधामुळे खून केला असल्याची कबुली

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील मदनवाडी गावाच्या हद्दीत २२ ऑक्टोबर रोजी मदनवाडी पुलाखालील पाण्यात एका गर्भवती महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला होता.यामुळे एकच खळबळ उडाली होती. मात्र केवळ २४ तासाच्या आत या महिलेची ओळख पटवण्यात आणि तिच्या मारेकऱ्याला गजाआड करण्यात स्थानिक गुन्हे शाखा पुणे ग्रामीण आणि भिगवण पोलिसांना यश आले आहे.बायकोचा खून केल्यानंतर आरोपी पतीने आपली बायको हरवल्याची तक्रार देखील पोलिसात दाखल केली होती मयत महिलेच्या हातावर रविराज अस गोंदलेले असल्यामुळे गुप्तहेर यांच्या माहिती आधारे मिळालेल्या माहिती वरून भिगवण पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास केला असता स्वतः नवराच मारेकरी निघाल्याचे समोर आले आहे.

१२ ऑक्टोबर रोजी पती-पत्नीमध्ये वाद झाले होते यातूनच तिचा खून केला आणि पुरावा



नष्ट करण्यासाठी चादरी मध्ये गुंडाळून तिला फेकून देण्यात आलं होतं हे पोलीस तपासात समोर आलं.

दिपाली सुदर्शन जाधव वय 30 वर्ष असं खून झालेला महिलेचे नाव असून ते बारामती तालुक्यातील कटफळ येथील आहे.

मृत महिलेच्या विवाहबाह्य संबंधाच्या संशयावरून तिचा पती सुदर्शन उर्फ रविराज रणजीत जाधव वय 36 वर्षे रा.कटफळ ता.बारामती यानेच 14 ऑक्टोंबर रोजी डोक्यात लोखंडी अवजड घाव करून महिलेचा खून करण्यात आला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह चादरीमध्ये गुंडाळून भिगवण येथील मदनवाडी पुलाच्या खालील पाण्यात फेकून दिल्याचं पोलीस तपासात समोर आलय.

# रिसोड ब्रह्माकुमारीज सेवा केंद्रात दीपोत्सव


**दैनिक युवक आधार**
**रिसोड /प्रतिनिधी :रणजितसिह. ठाकूर.**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय रिसोड येथे दीपावलीच्या शुभ मुहूर्तावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन 21 ऑक्टोबर च्या सकाळी करण्यात आले होते.रिसोड ब्रह्मकुमारीज सेवा केंद्राच्या संचालिका राजयोगिनी ब्रम्हाकुमारी ज्योती दिली यांच्या मार्गदर्शनाखाली दीपावली निमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करून दीपोत्सव साजरा करण्यात आला.झेंडूच्या फुलांनी अतिशय आकर्षक सजावट तसेच आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. 21 ऑक्टोबरच्या सकाळी दीपावलीचे अध्यात्मिक महत्त्व स्पष्ट करू प्रत्येक व्यक्तीने



आत्मिक दीप प्रज्वलित करून प्रकाशाकडे मार्गक्रमण करावे विकारांवर विजय मिळवावा तसेच ईश्वरीय ज्ञानाचा वैयक्तिक जीवनामध्ये उपयोग करून आत्मज्योती प्रज्वलित करून खरी दीपावली साजरी करावी असे मार्गदर्शन प्रसंगी ज्योती दीदींनी केले.उपस्थित सर्व ज्ञानार्थी भाऊ बहिणीच्या शुभ हस्ते प्रत्येकी एक दिवा प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा केला. श्री लक्ष्मी चैतन्य रूपात सजवून देवीची आराधना करण्यात आली त्यानंतर दिवाळीनिमित्त मंदार भिंगे व सायली चवरे यांनी दीपावली आली या गीतांवर नृत्य सादर केले. सर्व उपस्थित ज्ञानार्थी भाऊ बहिणींना ज्योती दिदिनी दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या व दीपावली निमित्त सर्वांना अल्पोपहार देऊन दीपोत्सव कार्यक्रमाचे सांगता करण्यात आले.दीपोत्सवला रिसोड सह सवड, मांगवाडी, रिठद, बोरखेडी, मांगूळझनक इत्यादी गीतापाठशाळेतील ज्ञानार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# पर्यटकांनी गजबजला श्रीवर्धन! दिवाळीच्या सुट्टीत समुद्रकिनाऱ्यावर उत्साहाचा माहोल





**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

दिवाळीच्या सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटकांनी आज श्रीवर्धन तालुक्याकडे धाव घेतली आहे. सकाळपासूनच शहरात आणि किनाऱ्यावर पर्यटकांची मोठी रेलचेल पाहायला मिळत आहे. स्थानिक हॉटेल्स, लॉजेस आणि रिसॉर्ट्स फुल्ल क्षमतेने भरले असून बाजारपेठाही पर्यटकांच्या गर्दीने गजबजल्या आहेत.

श्रीवर्धन समुद्रकिनारा, दिवेआगर, हरिहरेश्वर आणि बागमंडला या प्रसिद्ध पर्यटन स्थळांवर पर्यटक कुटुंबासह फिरत असून समुद्रकिनाऱ्यावर आनंदाने वेळ घालवत आहेत. स्थानिक व्यावसायिक, खाद्यपदार्थ विक्रेते आणि वाहनचालकांना याचा फायदा होत आहे.

वाहतुकीत काही ठिकाणी वाढ झाल्यामुळे पोलिसांकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पर्यटकांनी स्वच्छता आणि सुरक्षिततेचे नियम पाळावेत, अशी विनंती स्थानिक प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

एकूणच, दिवाळीच्या सुट्टीमुळे श्रीवर्धन तालुका सध्या पर्यटकांच्या गर्दीने उत्साहात न्हाऊन निघाला आहे.

# शेगांव तालुक्यातील शेतकऱ्यांना देण्यात आलेली नुकसानीची मदत तुटपुंजी - गोपाल तायडे

## मुख्यमंत्र्यांनी सात बरा कोरा करण्याचे आश्वासन पूर्ण करावे

**दैनिक युवक आधार**
**शेगाव वार्ताहर**

मोठा गाजा वाजा करीत नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या खत्या मध्ये शेतकऱ्यांच्या शेती पिकाच्या नुकसानाची बुलढाणा जिल्हा करीता 5 लाख शेतकऱ्यांना तब्बल 343 कोटी 87 लाख रु. एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे. या मध्ये शेगांव तालुक्यातील शेतकऱ्यांचा ही समावेश आहे. 30,646 पैकी 23,407 शेतकऱ्यांना नुकसानाची मदत मिळणार आहे.स्थानिक आमदारांच्या पाठपुराव्याने शेगांव तालुक्यातील शेतकऱ्यांनच्या शेती पिकाच्या नुकसानीची मदत मिळाली खरी. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मिळणारी ही मदत तुटपुंजी आहे. मुळत शेतकऱ्यांचे नुकसान प्रचंड प्रमाणात झालेले आहे .परिस्थिती खूप विदारक आहे .शेतकऱ्यांची परिस्थिती खूप बिकट झाली आहे. शेतकऱ्यांचं उभ पीक उद्ध्वस्त झाले, जमिनी खरडून गेल्यात. हतातोडला आलेला घास निसर्गाच्या वक्र दृष्टीने हिरावून घेतला आहे. प्रसार माध्यमांशी बोलताना स्वराज्य पक्षाचे नेते गोपाल तायडे यांनी माहिती दिली.शासना कडून भरीव अशी मदत मिळणे अपेक्षित होती परंतु शासनाकडून तुटपुंजी मदत जाहीर करण्यात आली आहे. सोयाबीनलां भाव नाही अत्यंत कमी भावा मध्ये सोयाबीन शेतकऱ्यांना विकाव लागत आहे.वेग वेगळ्या बाजारत माहिती घेतल्यास 500 रू क्विंटल पासून ते जास्तीत जास्त 3000 रू पर्यंत सोयाबीन विकाव लागत आहे. प्रतेक्ष्यात सोयाबीन अकरी 7500 रू खर्च लागतो. शासनाची नुकसानीची मदत हेक्टरी 8500 रू.असून शासनाची जाहीर केलेली नुकसानाची मदत तुटपूजी असून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारी आहे. शेतकऱ्यांचं शेतीच नुकसान पाहता जाहीर केलेली नुकसानीची मदत अपुरी आहे. प्रत्येक्षात पंजाब च्या धरतीवर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून हेक्टरी 50000 मदत जाहीर करण्यात यावी अशी मागणी होती. त्याच बरोबर मुख्यमंत्र्यांनी दिलेले कर्जमाफीचे सातबारा कोरा करण्याचे आश्वासन पूर्ण करण्यात यावे अश्या मागण्या होत्या. परंतु शेतकऱ्यांची यामुळे घोर निराशा होऊन बसली आहे.



# गोष्ट एका समोशाची कहाणी एका जिगरबाज जालिंदर सुरवसेची

**दैनिक युवक आधार**
**रायमोहा तालुका**

शिरूर (का.) जिल्हा बीड येथील सर्व सामान्य कुटुंबातील आमचा मित्र जालिंदर सुरवसे मध्यंतरी अनेक संकटं आली काही नैसर्गिक तर काही वैयक्तिक पण जालिंदर हारला नाही. सतत भेट झाली की सर काय करु जीवनात खूपच संकटे येतात अडचणी येतात मग बोलत असताना संकट अडचणी का येतात या वर विचार करायला पाहिजे आणि यातून बाहेर पडण्यासाठी काय केलं पाहिजे असं आमच्या बोलण्यात आलं मग काही तरी व्यवसाय कराव वाटतंय पण भांडवल नाही मग विचार आला कमी भांडवली जास्तीत जास्त नफा असा कोणता व्यवसाय आहे, तर समोर नाव आलं समोसा मग तो जालू आणि तो समोसा आज एका यशस्वी उंचीवर गेला आहे, मित्रांनो अनेकदा आपल्याला वाटतं, एक गरिब कुटुंब काय



करू शकतं? त्यांच्या कडे ना पैसा असतो, ना संपत्ती, ना मोठं पाठबळ पण जेव्हा जिद्द, मेहनत आणि कुटुंबाची साथ यांचे त्रिकुट एकत्र येतं ना तेव्हा केवळ व्यवसाय नव्हे तर एक प्रेरणा निर्माण होते, अशाच प्रेरणादायी वाटचालीचा चेहरा म्हणजे जालिंदर सुरवसे आणि त्याचं कुटुंब, जालिंदर सुरवसे हा एका अत्यंत सामान्य, अत्यंत गरीब कुटुंबातील व्यक्ती, आयुष्याने त्यांना अनेकदा झटपाटून टाकलं आर्थिक चणचण, कर्जाचं ओझं, अपमान, उपासमार या मुळे तो मानसिकदृष्ट्या खचला होता एक क्षण असा आला होता पण.... कुटुंबाच्या डोळ्यातील अश्रू, त्यांच्या पत्नीचा धीर आणि मुलाच्या निरागस चेहऱ्याने नवं आयुष्य सुरू झालं. जालिंदरने त्याची पत्नी मुलगा यांच्या मदतीनं घरच्या घरी समोसे बनवण्यास सुरुवात केली. हा व्यवसाय फार मोठा नव्हता, पण त्यांच्या दृष्टीनं तो एक "नव्या जीवनाचं पहिलं पाऊल" सकाळी लवकर उठून समोसे तयार करणे, त्यांना विक्रीसाठी गावोगावी घेऊन जाणे ही प्रक्रिया त्यांच्या रोजच्या जीवनाचा भाग झाली, पत्नीच्या व त्यांच्या हातचा स्वादिष्ट समोसा बनवणं मुलाचं ते हसतमुखाने विकणं आणि जालिंदरच त्या मागचं प्रामाणिक कष्ट मेहनत या तिघांच्या कष्टामुळे या समोशांना चव मिळालीच, पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे लोकांच्या मनात जागा मिळाली. आज जालिंदर सुरवसे यांचा समोसा व्यवसाय केवळ एक उपजीविकेचं साधन नाही, तर अनेकांसाठी प्रेरणेचा स्रोत बनला आहे. त्यांच्या व्यवसायाची खास गोष्ट म्हणजे प्रामाणिकपणा, सातत्य, आणि आत्मसन्मान ते भलेही मोठ्या गाड्यांतून फिरत नाहीत, पण त्यांच्या समोशांच्या चवीसोबत त्यांची कहाणी ही लोकांच्या ओठांवर आली आहे. प्रत्येक समोसा त्यांच्या संघर्षाची साक्ष देतोय, या संपूर्ण प्रवासात त्यांची पत्नी सतत त्यांच्या पाठीशी उभी राहिली आहे. एका हातात संसार, दुसऱ्या हातात व्यवसाय अशा रीतीनं तिनं घर चालवलं, मुलगा समोसे पोहोचवण्याचं काम हसत हसत करतो."आम्ही श्रीमंत नाही, पण आमचं कुटुंब आमचं धन आहे", असं जालिंदर अभिमानाने सांगतो आज जालिंदर सुरवसे यांचं कुटुंब त्या सर्वांसाठी एक आदर्श ठरतंय जे परिस्थितीसमोर हार मानत नाहीत ते पुढे जातात, संकटं येतात अडचणी येतात पण हार मानू नका आत्महत्या सारखा निर्णय कधी ही पर्याय असू शकत नाही. मेहनत, चिकाटी आणि कुटुंबावर विश्वास ठेवा लहान व्यवसाय हळूहळू मोठं रूप धारण करतो. आज ही जालिंदर सुरवसे आणि त्यांचं कुटुंब आपल्या स्वप्नांच्या मागे धावत आहे, समोशांचं उत्पादन वाढवणं, नवीन ठिकाणी विक्री सुरू करणं अशा योजना त्यांनी डोळ्यासमोर ठेवलेल्या आहेत, त्यांचा संघर्ष अजून संपलेला नाही, पण एक गोष्ट मात्र निश्चित त्याचं यश अटळ आहे. त्यांच्या कहाणीला उजाळा देणं, म्हणजे संघर्ष करणाऱ्या हजारो लोकांना प्रेरणा देणारे जालिंदर सुरवसे समोसे विकणारा नाही, तर जिद्द चिकाटी प्रचंड इच्छाशक्ती सामर्थ्य आत्मविश्वास पेरणारा जालिंदर सुरवसे...

**संकलन व लेखन...**
**श्री.बहिर भारत दामोधर**
**सहशिक्षक जिल्हा परिषद**
**अहिल्यानगर**
**पार्थ डिजिटल प्रिंटिंग,**
**शिरूर(का.)**

# वाकद जी प सर्कल मध्ये लखन ठाकूर चर्चेत

**दैनिक युवक आधार**
**रिसोड /प्रतिनिधी :-रणजितसिह ठाकुर**

सोड तालुक्यातील नऊ जिल्हा परिषद सर्कल पैकी वाकद जिल्हा परिषद सर्कल विशेष चर्चेत आले आहे त्याचे कारण म्हणजे भारतीय जनता पार्टीमध्ये मागील अनेक वर्षापासून स्वतःच्या भरवशावर शेतकऱ्यांच्या हिताचे व तालुक्यातील विविध प्रश्न आपल्या वरिष्ठाच्या माध्यमातून तथा मंत्रिमंडळातील संबंधित मंत्र्यांच्या निर्देशनात आणून समस्या सोडविण्याचे निस्वार्थपणे कार्य करणारे लखन सिंह ठाकुर यांनी जिल्हा परिषद वाकद सर्कल मधून निवडणूक लढविण्याचा मानस व्यक्त केला आहे. त्यामुळे वाकद सर्कल चर्चेत आले आहे. लखन ठाकूर यांनी शेती व शेतकरी यांच्या विषयी केलेले कार्य रिसोड तालुक्यातील सर्व जनतेला माहिती आहे राजकीय क्षेत्रातील अनुभव कमी असला




तरी सामाजिक, शेती विषयक समस्यांची जाणीव असणारे व त्या सोडवण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न करणारे लखन सिंह ठाकुर सर्वश्रुत आहेत. "समाजापेक्षा मतदार विकासाला मते देतो" हा त्यांचा ठाम निर्धार आहे त्यामुळे योग्य व्यक्तीला सर्व समाजाचे लोक अगदी निस्वार्थपणे मतदान करतात यावर त्यांचा विश्वास आहे त्यामुळे लखन ठाकूर समाजाच्या नव्हे तर विकासाच्या मुद्द्यावर शेतकरी व शेतीच्या हिताच्या प्रश्नाच्या जोरावर मतदारांपर्यंत जाण्यासाठी तत्पर आहे वाकद सर्कल मधील मतदार सुद्धा नवीन चेहऱ्याला संधी देण्याच्या मनस्थितीत आहेत. वाकद सर्कल मध्ये अनेक प्रश्न अनेक वर्षापासून जशीच्या तशीच आहेत त्याची सोडवणूक करण्यासाठी चांगला उमेदवार प्रतिनिधी व्हावा यासाठी मतदार लखन सिंह ठाकुर यांच्या नावाची जोरदार चर्चा करीत आहेत.त्यामुळे वाकत सर्कल मध्ये राजकीय रंगत चांगलीच वाढली आहे ठाकूर हे भारतीय जनता पार्टीचे खंदे समर्थ व निष्ठावंत कार्यकर्ते असल्यामुळे भाजपा त्यांना तिकीट देते किंवा नाही यावर सुद्धा त्यांचे राजकीय भवितव्य अवलंबून असणार आहे मात्र सध्या तरी लखन सिंह ठाकुर वाकद सर्कल मध्ये राजकीय विरोधकांमध्ये व सामान्य जनतेमध्ये कमालीचे चर्चेत आहेत.

# अंधेरीत 'रॉकेट 'मुळे लागली भयंकर आग; सोसायटीमध्ये तातडीने कडक नियमांची मागणी

**दैनिक युवक आधार**

अंधेरी पश्चिम येथील प्रथमेश हाऊसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटी येथील मुंबईचे माजी उपमहापौर व भाजपा नेते अरुण देव यांच्या बी/११०२ फ्लॅटमध्ये मंगळवारी मध्यरात्री १२.३० वाजताच्या सुमारास फटाक्यामुळे भीषण आग लागली. रॉकेट थेट बाल्कनीमध्ये घुसल्याने एसी यूनिटला आग लागली.

फटाक्यांमधील रॉकेट त्यांच्या फ्लॅटच्या बेडरूमच्या बाल्कनीवर आदळले आणि त्याच ठिकाणी ठेवलेल्या एसी यूनिटला आग लागली.

या आगीमुळे मोठा धोका निर्माण होऊ शकला होता, परंतु, वेळेवर मिळालेल्या मदतीमुळे मोठे नुकसान टळले.

आग विझवण्यासाठी सुरक्षारक्षक आणि शेजाऱ्यांनी तत्काळ मदत केली. या घटनेमुळे, सोसायटीमध्ये फटाक्यांच्या वापराबाबत कडक नियमांची आवश्यकता उभी राहिली आहे. सामाजिक दृष्टिकोनातून, फटाक्यांच्या



वापरासाठी कडक नियम करून त्यात फटाक्यांचे प्रकार आणि वापराच्या वेळेची मर्यादा ठरवण्यात यावी.

मध्यरात्री १०.३० नंतर फटाक्यांचे वापर थांबवावे. धोकादायक फटाक्यांचे वापर पूर्णपणे बंद करावे.

नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी सोसायटीत एक अधिकारी नियुक्त करावा.


धोका निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी तातडीच्या कारवाईची मागणी देव यांनी केली आहे. अशी घटना टाळण्यासाठी सर्व सोसायटी सदस्यांनी यावर गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संरक्षणासाठी उच्चस्तरीय समिती; मुंबई उच्च न्यायालयाकडून समिती स्थापन

**दैनिक युवक आधार**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या (एसजीएनपी) संरक्षणासाठी उद्यानाभोवती लवकरात लवकर भिंत बांधण्यासाठी आणि उद्यानाच्या भूमीवरील आणखी अतिक्रमण रोखण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचवण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे.

या समितीत महाराष्ट्राचे माजी डीजीपी सुबोध जयस्वाल, माजी मुख्य सचिव डॉ. नितीन करीर आणि 'एसजीएनपी' बोरिवलीच्या वनसंरक्षक व संचालिका अनिता पाटील यांचा समावेश आहे. ही समिती अतिक्रमण केलेल्यांच्या पुनर्वसनासाठी जमीन शोधणे आणि




पुनर्वसन करण्यात येणाऱ्या घरकुलांसाठी निधी व बांधणीच्या दृष्टीने उपाय सुचवणार आहे.२०२३ मध्ये सम्यक जनहित सेवा संस्थेने दाखल केलेल्या अवमान याचिकेवरील सुनावणीनंतर मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने हा आदेश जारी केला.१९९५ च्या रिट याचिकेवर १९९७ पासून देण्यात आलेल्या अनेक न्यायालयीन आदेशांचे पालन न केल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. मुंबई आणि ठाण्यात १०४ चौ. किमी. च्या परिसरात पसरलेल्या उद्यानाच्या संरक्षणासाठी ही याचिका दाखल करण्यात आली होती.

**पुनर्वसनासाठी मरोळ-मरोशी येथील ९० एकर जमीन**

यावर ॲडव्होकेट जनरल बीरेन्द्र सराफ यांनी न्यायालयाला आश्वस्त केले की, राज्य सरकार न्यायालयाच्या मागील सर्व आदेशांचे पालन करण्यासाठी पावले उचलत आहे. त्यांनी सांगितले की, अतिक्रमण केलेल्यांच्या पुनर्वसनासाठी मरोळ-मरोशी येथे ९० एकर जमीन उपलब्ध करण्यात आली असून त्यापैकी ४४ एकर जमीन त्वरित निवासी विकासासाठी उपलब्ध करून दिली जाईल, तर उर्वरित ४६ एकर जमीन वनभूमी म्हणून अधिसूचित नसल्यास लवकरच संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.